• वर्ष : ०३ • अंक : २८१ • पुणे • गुरूवार, दि. ०२ जुलै २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

1,22,570

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

पुण्यातील लोकप्रिय दैनिक





वडिलांचे निधन : मुरलीधर मोहोळ यांची जनसेवा सुरूच 3



अक्षय इंगळे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर 4

## ठळक बातम्या

### जुन्नर : दारूबंदीचे सहा गुन्हे दाखल

जुन्नर (आरंभ पर्व) : जुन्नर पोलिसांनी अवैध दारूबाबत कडक कारवाई सुरू केली आहे. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षकांनी पोलीस ठाणे हद्दीत सुरू असलेले अवैध दारूबाबत कडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दत्तात्रेय गुंड यांनी पोलीस पथकाच्या मदतीने अवैध दारूबाबत कारवाई सुरू केली. यातील काही आरोपींना अटक करण्यात आली असून, फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

### लोणावळ्यात संततधार

लोणावळा (आरंभ पर्व) : गेल्या काही दिवसांपासून लोणावळ्यात पावसाची संततधार सुरू असून संपूर्ण परिसर निसर्गसौंदर्याने खुलून गेला आहे. डोंगर-दऱ्यांवर दाट धुक्याची चादर पसरली असून हिरवागार निसर्ग, खळाळून वाहणारे ओढे-नाले आणि कडेकपाऱ्यांवरून कोसळणारे धबधबे पर्यटकांना मोहिनी घालत आहेत. दरम्यान बुधवारी (ता. १) सकाळपर्यंत २४ तासांत ७२ मिमी (२.८३ इंच) पावसाची नोंद झाली आहे. तर चालू वर्षातील एकूण पर्जन्यमान ४७३ मिमी (१८.६२ इंच) इतके झाले आहे. सततच्या पावसामुळे लोणावळा, भुशी धरण परिसर, टायगर पॉइंट, लायन्स पॉइंट, राजमाची, लोहगड, विसापूर यांसह विविध पर्यटनस्थळांवर निसर्गप्रेमी आणि पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. धुक्याने वेढलेले डोंगर, हिरवाईने नटलेले घाटमाथे आणि ओसंडून वाहणारे धबधबे पाहण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने लोणावळ्याकडे आकर्षित होत आहेत. दरम्यान, मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी रस्त्यांवर पाणी साचणे, घाटमाथ्यावर दाट धुके आणि घसरडे रस्ते अशी परिस्थिती निर्माण होत असल्याने वाहनचालकांनी तसेच पर्यटकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# आबाळ दूर करण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा

## पहिल्या समरसता लोककला संमेलनाच्या अध्यक्षपदावरून पद्मश्री रघुवीर खेडेकर यांची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

समाजात समरसता वृद्धिंगत करण्याच्या कामात लोककलावंतांचा सहभाग वाढावा या उद्देशाने समरसता लोककला संमेलन आयोजित करण्याचा उपक्रम उल्लेखनीय असला तरी प्रत्यक्षात खुद्द लोक कलावंत अद्यापही उपेक्षितांचे जगणे जगत असून त्यांची आबाळ दूर करण्यासाठी शासनाने पुढाकार घेणे गरजेचे आहे, अशी आग्रही मागणी पहिल्या समरसता लोककला संमेलनाचे अध्यक्ष पद्मश्री रघुवीर खेडेकर यांनी केली.



लोककलावंतांच्या अडचणी शासनापर्यंत पोहोचाव्या, लोककलावंतांमध्ये विचारांचे आदान प्रदान व्हावे व विविध लोककलांचा रसिकांना परिचय व्हावा, या दृष्टीने राज्याचा सांस्कृतिक विभाग, सांस्कृतिक संचालनालय आणि समरसता साहित्य परिषद यांच्या वतीने या वर्षापासून समरसता लोककला संमेलन आयोजित करण्यात येत आहे. या पहिल्या संमेलनात ज्येष्ठ अभिनेत्री आणि लावणी नर्तिका मधू कांबीकर यांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. प्रकृती अस्वस्थ असल्यामुळे त्या अनुपस्थित असल्याने त्यांच्या वतीने त्यांच्या भगिनी रत्ना कांबीकर यांनी स्वीकारला.

याप्रसंगी मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आलेगांवकर, लोककलावंत नंदेश उमप, पद्मश्री वितहाबाई नारायनगावकर यांच्या कन्या मंगला बनसोडे, लीला गांधी, जयमाला इनामदार, सुरेखा पुणेकर, छाया आणि माया खुतेगावकर, राधा खुडे, बिग बॉस फेम अहिराणी गायक सचिन कुमावत, नृत्यांगना वैशाली जाधव, रेशमा मुसळे, अनिल मोरे, सांस्कृतिक कार्य संचालनायाच्या जान्हवी जानकर, वारकरी परिषदेचे अध्यक्ष विश्वनाथ गराडकर, भाजप शहराध्यक्ष आणि संमेलनाचे स्वागताध्यक्ष धीरज घाटे, संमेलनाचे आयोजक धनंजय खुडे, निलेश गद्रे, डॉ प्रसन्न पाटील आदि मान्यवर उपस्थित होते.समाजात एकोपा वाढावा, विचारांची देवाण-घेवाण व्हावी, म्हणजेच सामाजिक समरसता! लोक कलावंत आपल्या कलेच्या माध्यमातून शतकानुशतके प्रबोधनाचे, सांस्कृतिक आदान प्रदानाचे आणि सलोखा निर्माण करण्याचे कार्य परंपरेने करीत आहेत. माञ, लोक कलावंतांचे स्वतःचे जगणे अजूनही आव्हानात्मक स्वरूपाचे आहे, याकडे खेडेकर यांनी आपल्या भाषणात लक्ष वेधले.

समाजात साहित्य आणि संस्कृतीच्या माध्यमातून समरसता निर्माण करण्याच्या दृष्टीने समरसचा साहित्य परिषद 25 वर्षापासून कार्यरत आहे. यावर्षीपासून आयोजित करण्यात येत असलेल्या समरसता लोककला संमेलनाचे स्वरूप केवळ उत्सवी नाही. लोककलावंतांच्या अडचणी सरकारपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने दुवा निर्माण करणे आणि समाज प्रबोधनाच्या प्रक्रियेत लोककलावंतांचा सहभाग वाढविणे, ही या आयोजनातील प्रमुख उद्दिष्ट आहेत.

लोकं कलावंतांचे हित साधण्यासाठी तसेच लोककलांचा उपयोग समाजासाठी करण्याच्या उद्देशाने संघटन उभे करण्याचे काम परीक्षा त्यांनी हाती घेतले आहे. हे संघटन विद्रोहासाठी नाही तर समाजाला आणि देशाला पुढे नेण्यासाठी आहे, असे समरसता साहित्य परिषदेचे कार्यवाह डॉ प्रसन्न पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले.

> शासनाच्या लोककलावंतांकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी लोक कलावंत निश्चितपणे पुढे येतील. मात्र, लोककलावंतांकडे आजही गावकुसाबाहेर असल्याप्रमाणे बघितले जात आहे. आपली कला सादर करण्यासाठी गावोगाव फिरणाऱ्या कलावंतांना प्रस्थापितांकडून अन्याय सहन करावा लागतो. स्थानिक पोलिस आणि प्रशासन देखील कलावंतांच्या तक्रारींची दखल न घेता प्रस्थापितांची पाठराखण करतात. हे सर्व आम्हाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या कानावर घालायचे होते. मात्र, त्यांच्या अनुपस्थितीने आमची निराशा झाली, असे परखड मतही खेडेकर यांनी व्यक्त केले.

# पोलिओच्या दोन थेंबांसाठी जनजागृती

## काकासाहेब चव्हाण यांचा पालकांना जागरूकतेचा संदेश

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

"प्रत्येक बालक सुरक्षित, प्रत्येक घर पोलिओमुक्त" हा संदेश घेऊन धायरी परिसरात राष्ट्रीय पल्स पोलिओ अभियान २०२६ उत्साहात राबविण्यात आले. भैरवनाथ मंदिर, ग्रामपंचायत कार्यालय आणि मारुती मंदिर येथे उभारलेल्या लसीकरण केंद्रांना पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक काकासाहेब चव्हाण यांनी भेट देत बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजले.



या प्रसंगी त्यांनी उपस्थित पालकांशी संवाद साधत, ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओची लस मिळणे ही केवळ शासनाची नव्हे, तर प्रत्येक पालकाचीही जबाबदारी आहे, असे सांगितले. कोणतेही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. अभियानादरम्यान आरोग्य कर्मचारी, आशा व अंगणवाडी सेविका, स्वयंसेवक यांच्या कार्याचे त्यांनी कौतुक केले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच पोलिओमुक्त भारताचे स्वप्न साकार होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

धायरी परिसरातील नागरिकांनी या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने आपल्या चिमुकल्यांना पोलिओचे दोन थेंब पाजण्यासाठी लसीकरण केंद्रांवर उपस्थिती लावली.

# विवाहपूर्व पार्श्वभूमी पडताळणी ही आता पर्याय नव्हे तर काळाची गरज!

- **केतन अग्रवाल प्रकरणानंतर विवाहपूर्व तपासणीची गरज अधोरेखित**
- **अनेक कुटुंबे फसवणूक आणि संकटांपासून वाचू शकतात: डिटेक्टिव्ह प्रिया काकडे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यासह देशभरात चर्चेत असलेल्या केतन अग्रवाल खून प्रकरणानंतर विवाहपूर्व पार्श्वभूमी पडताळणी (Pre-Matrimonial Investigation) आणि भावी जोडीदाराची सत्य माहिती जाणून घेण्याचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे, असे प्रतिपादन स्विफ्ट डिटेक्टिव्ह अँड इन्व्हेस्टिगेशनच्या संचालिका डिटेक्टिव्ह प्रिया काकडे यांनी केले. पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. विवाहपूर्व तपासणी, विवाहबाह्य संबंध, वैवाहिक फसवणूक, आर्थिक गुन्हे, घटस्फोट आणि कौटुंबिक वाद यासंदर्भातील अनुभव त्यांनी यावेळी



मांडले. प्रिया काकडे म्हणाल्या की, लग्न हा व्यक्तीच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा निर्णय असतो. मात्र आजही अनेक कुटुंबे केवळ आर्थिक स्थिती, सामाजिक प्रतिष्ठा, शिक्षण किंवा बाह्य आकर्षण पाहून विवाह ठरवतात. भावी वधू किंवा वराचे पूर्वीचे संबंध, घटस्फोट, आर्थिक व्यवहार, गुन्हेगारी पार्श्वभूमी, मानसिक स्थिती किंवा इतर महत्त्वाच्या बाबींची पडताळणी केली जात नाही. त्यातून पुढे गंभीर कौटुंबिक व कायदेशीर समस्या निर्माण होतात.

अलीकडील केतन अग्रवाल आणि राजा रघुवंशी यांसारख्या चर्चित घटनांनी समाजासमोर अनेक प्रश्न उभे केले आहेत. विवाहबाह्य संबंध, फसवणूक, जबरदस्तीने लावलेली लग्ने, खोटी माहिती देऊन जुळवलेले विवाह आणि आर्थिक स्वार्थातून निर्माण होणारे वाद यांचे प्रमाण वाढत असल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदविले. "अनेक वेळा मुलगा किंवा मुलगी लग्नाबाबत इच्छुक नसतानाही सामाजिक दबावामुळे विवाह केला जातो. काही प्रकरणांमध्ये पूर्वीचे प्रेमसंबंध सुरूच असतात. त्याची माहिती लपवली जाते. परिणामी लग्नानंतर काही महिन्यांतच वाद, मानसिक छळ, घटस्फोट किंवा गुन्हेगारी स्वरूपाच्या घटना घडतात.

योग्य वेळी पार्श्वभूमी पडताळणी केल्यास अशा अनेक घटना टाळता येऊ शकतात," असे काकडे यांनी सांगितले. त्यांनी सांगितले की, प्री-मॅट्रिमोनियल तपासणीमध्ये व्यक्तीची वैवाहिक स्थिती, पूर्वीचे विवाह किंवा घटस्फोट, आर्थिक व्यवहार, मालमत्ता, गुन्हेगारी नोंदी, सामाजिक वर्तणूक, व्यसनाधीनता, चालू संबंध आणि इतर महत्त्वाच्या बाबींची पडताळणी केली जाऊ शकते. लग्नाच्या प्रक्रियेदरम्यान सतत टाळाटाळ करणे, संवाद टाळणे, वारंवार खोटी कारणे सांगणे, कुटुंबाशी संपर्क टाळणे किंवा लग्नाबाबत अनास्था दाखवणे हे महत्त्वाचे "रेड फ्लॅग्स" असल्याचेही त्यांनी नमूद केले.

स्विफ्ट डिटेक्टिव्ह अँड इन्व्हेस्टिगेशनने २००६ पासून आजपर्यंत विवाहपूर्व पडताळणी, विवाहबाह्य संबंध, आर्थिक फसवणूक, कौटुंबिक वाद, बेपत्ता व्यक्तींचा शोध, मॅट्रिमोनियल फ्रॉड आणि कॉर्पोरेट तपास अशा 2,048 हून अधिक प्रकरणांचा यशस्वी तपास केला असल्याची माहिती त्यांनी दिली.

"आमचा उद्देश केवळ कोणावर संशय घेणे नाही, तर वस्तुस्थिती समोर आणणे आहे. विवाहपूर्व योग्य माहिती मिळाल्यास अनेक कुटुंबांचे आर्थिक, मानसिक आणि सामाजिक नुकसान टाळता येते. सत्य माहितीच्या आधारे घेतलेला निर्णय हा नेहमीच सुरक्षित निर्णय ठरतो," असेही काकडे यांनी स्पष्ट केले.

# ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील त्रुटी तात्काळ दूर करा

- **विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी अभाविपचे शिक्षण संचालनालयाला निवेदन**
- **साडेसहा लाख विद्यार्थी अजूनही प्रवेशापासून वंचित!**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील इयत्ता अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थी, पालक आणि कनिष्ठ महाविद्यालयांना मोठ्या प्रमाणावर तांत्रिक व प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागत असल्याच्या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) पश्चिम महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्याचे संचालक मा. महेश पालकर यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. यावेळी प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांना येणाऱ्या विविध समस्या, अलॉटमेंट पद्धतीतील त्रुटी, शुल्कातील अनियमितता, ग्रामीण भागातील जनजागृती तसेच प्रवेश प्रक्रियेतील पारदर्शकता यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.

अभाविपने निवेदनात नमूद केले की, राज्यस्तरीय केंद्रीभूत ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे हे दुसरे वर्ष असूनही विद्यार्थ्यांना आजही अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा उद्देश पारदर्शकता, समान संधी आणि गुणवत्तेनुसार प्रवेश देणे हा असताना प्रत्यक्षात वेबसाईट वारंवार बंद पडणे, ओटीपी न मिळणे, ऑनलाइन शुल्क भरताना व्यवहार अडकणे, कागदपत्रे अपलोड न होणे अशा तांत्रिक अडचणींमुळे हजारो विद्यार्थ्यांचा वेळ वाया जात असून अनेक विद्यार्थ्यांना अर्ज पूर्ण करण्यासही अडथळे निर्माण होत आहेत. या सर्व तांत्रिक त्रुटी कायमस्वरूपी दूर करण्यासाठी सक्षम सर्व्हर व्यवस्था आणि प्रभावी तांत्रिक यंत्रणा उभारण्याची मागणी अभाविपने केली आहे. ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यामागील प्रमुख उद्देश खासगी क्लासेस व काही महाविद्यालयांमधील अनधिकृत भागीदारी रोखणे आणि गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवून देणे हा होता. मात्र काही ठिकाणी या प्रक्रियेलाच हरताळ फासण्याचे प्रकार सुरू असून, टायअप असलेले तसेच नव्याने सुरू झालेल्या महाविद्यालयांमधील तुकड्यांची संख्या वाढवून प्रवेश प्रक्रियेत पळवाटा काढल्या जात असल्याचे अभाविपने निदर्शनास आणून दिले. त्यामुळे पहिल्याच फेरीपासून अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांतील आरक्षित व खुल्या प्रवर्गातील जास्तीत जास्त जागा भरल्या जातील, अशी सुधारित कार्यपद्धती अवलंबावी, अशी मागणी करण्यात आली.

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी आणि पालकांना अद्यापही संपूर्ण ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे शासनाने शाळा स्तरावरच विद्यार्थी व शिक्षकांसाठी प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम आयोजित करावेत. विद्यार्थी दहावीमध्ये शिकत असतानाच त्यांना पुढील प्रवेश प्रक्रियेचे मार्गदर्शन मिळेल, अशी कायमस्वरूपी यंत्रणा उभारावी, अशी मागणी अभाविपने केली. याचबरोबर राज्यातील सर्व आश्रमशाळांनाही या केंद्रीभूत ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्यात यावे, जेणेकरून राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना समान संधी उपलब्ध होईल, अशी भूमिका मांडण्यात आली.

राज्यातील अनुदानित आणि विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये आकारल्या जाणाऱ्या शुल्कामध्ये मोठी तफावत असल्याचेही अभाविपने निदर्शनास आणले. भौगोलिक व शासनाच्या निकषांनुसार शुल्क निश्चित करून कोणत्याही महाविद्यालयाने नियमबाह्य अथवा छुपे शुल्क आकारू नये, यासाठी कठोर नियंत्रण यंत्रणा उभारावी तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावर्षी दहावीचा निकाल वेळेपूर्वी लागूनही अकरावी प्रवेश प्रक्रियेला मोठा विलंब झाला आहे. जवळपास दोन महिने प्रक्रिया सुरू असूनही अद्याप मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण झालेले नाहीत. उपलब्ध आकडेवारीनुसार सुमारे १४ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी अर्ज केले असताना त्यापैकी केवळ साडेसात लाख विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळाला आहे. त्यामुळे उर्वरित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर १० जुलैपासून प्रवेश निश्चित झालेल्या विद्यार्थ्यांचे वर्ग सुरू करण्याचे आदेश राज्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात यावेत तसेच पुढील शैक्षणिक वर्षापासून नियमितपणे १ जुलैपासून अकरावीचे वर्ग सुरू होतील, याची शासनाने दक्षता घ्यावी, अशी मागणीही अभाविपने केली. यावेळी अभाविपचे प्रदेश मंत्री अथर्व कुलकर्णी यांनी सांगितले की, ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया ही विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सुरू करण्यात आली असली तरी अद्यापही ५०% विद्यार्थी प्रवेशापासून वंचित आहेत. प्रक्रियेतील तांत्रिक त्रुटी, विलंब आणि व्यवस्थापनातील उणिवांमुळे विद्यार्थ्यांनाच मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

राज्यात एकूण ९,६६९ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये २२,१४,४०६ एवढ्या एकूण जागा असून १४,३७,६५६ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज केले आहेत. म्हणजेच जवळपास साडेसात लाख अतिरिक्त जागा आहेत, आवश्यकता नसताना एवढ्या जागा महाविद्यालयांना वाढवून देण्याचे कारण काय? खासगी क्लासेस आणि कनिष्ठ महाविद्यालय यांच्यातील अनधिकृत भागीदारी जिवंत ठेवण्यासाठी शासनातीलच काही अधिकारी छुप्या पद्धतीने मदत करत आहेत का? याचा शोध घेणे गरजेचे आहे. शासनाने अभाविपच्या सर्व मागण्या मान्य करीत तातडीने या सर्व त्रुटी दूर करून प्रवेश प्रक्रिया अधिक पारदर्शक, विश्वासार्ह आणि विद्यार्थी हिताची करावी.

# संघर्ष, संघटन आणि नव्या राजकीय समीकरणांचा वेधभरारी घेईल का?

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही वर्षांत सर्वाधिक उलथापालथ झाली असेल, तर ती शिवसेनेतील फूट आणि त्यानंतर बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे. पक्षातील मोठा गट वेगळा झाल्यानंतर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आली. काहींनी पक्ष संपुष्टात येईल, असा अंदाज व्यक्त केला. मात्र, राजकारणात अंतिम निकाल जनतेच्या मनात ठरतो आणि त्यामुळेच उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील पक्ष पुन्हा भरारी घेईल का, हा प्रश्न आजही चर्चेचा विषय आहे.

**संकटातून उभे राहण्याची परंपरा** : राजकीय इतिहास पाहिला तर अनेक पक्षांनी मोठ्या संकटानंतर पुनरागमन केले आहे. पराभव, फुटी, सत्तेपासून दूर राहणे किंवा संघटनात्मक अडचणी यानंतरही अनेक नेत्यांनी नव्याने पक्ष उभा केला. उद्धव ठाकरे यांच्यासमोरही अशाच प्रकारचे आव्हान उभे राहिले आहे. परंतु, त्यांच्या सभांना मिळणारा प्रतिसाद, कार्यकर्त्यांमधील निष्ठा आणि पक्षाशी भावनिक नाते अजूनही टिकून असल्याचे अनेकदा दिसून आले आहे.

**कार्यकर्त्यांची निष्ठा हेच मोठे बळ :** कोणत्याही राजकीय पक्षाची खरी ताकद ही त्याची संघटनात्मक रचना आणि तळागाळातील कार्यकर्ते असतात. अनेक ज्येष्ठ नेते पक्षातून बाहेर पडले असले, तरी मोठ्या प्रमाणात शाखा प्रमुख, पदाधिकारी आणि सामान्य शिवसैनिक उद्धव ठाकरे यांच्यासोबत राहिले. अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांनी नव्याने संघटन उभारण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे.

राजकीय संघर्षाच्या काळात कार्यकर्त्यांची मानसिकता टिकवून ठेवणे हे नेतृत्वाचे मोठे यश मानले जाते. उद्धव ठाकरे यांनी सातत्याने संवाद साधण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्यांना संघटनात्मक आधार कायम राहिल्याचे समर्थकांचे मत आहे.

**भावनिक राजकारणाचा प्रभाव :** शिवसेना हा केवळ राजकीय पक्ष नसून अनेकांसाठी भावनिक ओळखीचा विषय राहिला आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या वारशाशी जोडलेली भावना आजही अनेक मतदारांमध्ये आहे. उद्धव ठाकरे यांनी अनेक भाषणांमध्ये याच भावनिक नात्याला अधोरेखित केले आहे. तथापि, भावना महत्त्वाची असली तरी दीर्घकालीन यशासाठी संघटन, प्रभावी नेतृत्व, स्थानिक पातळीवरील सक्रियता आणि निवडणूक व्यवस्थापनही तितकेच आवश्यक असते.



**बदलते राजकीय वातावरण :** महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे सतत बदलत असतात. स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांमध्ये मतदारांचा कल वेगवेगळा असू शकतो. महागाई, बेरोजगारी, स्थानिक प्रश्न, विकासकामे, शेतकरी आणि शहरी मतदारांचे प्रश्न हे सर्व घटक मतदानावर प्रभाव टाकतात. जर उद्धव ठाकरे यांचा पक्ष या प्रश्नांवर प्रभावी भूमिका मांडण्यात आणि मतदारांपर्यंत पोहोचण्यात यशस्वी झाला, तर त्याचा राजकीय फायदा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**नव्या पिढीपर्यंत पोहोचण्याचे आव्हान** : आजचा मतदार विशेषतः युवा वर्ग सामाजिक माध्यमांवर अधिक सक्रिय आहे. केवळ पारंपरिक सभा पुरेशा ठरत नाहीत. डिजिटल प्रचार, स्थानिक नेतृत्वाला संधी, नव्या चेहऱ्यांना प्राधान्य आणि विकासाभिमुख अजेंडा यावर पक्षाने भर दिल्यास त्याचा सकारात्मक परिणाम होऊ शकतो.

विरोधकांसमोरील आव्हानेही महत्त्वाची

राजकीय यश हे केवळ स्वतःच्या ताकदीवर ठरत नाही; विरोधकांच्या कामगिरीवरही ते अवलंबून असते. सत्ताधारी पक्षांविषयी मतदारांमध्ये असमाधान निर्माण झाल्यास विरोधी पक्षांना संधी मिळते. अशा परिस्थितीत प्रभावी पर्याय म्हणून स्वतःला सादर करणे ही उद्धव ठाकरे यांच्या पक्षासमोरील महत्त्वाची जबाबदारी असेल.

**निवडणुकाच ठरवतील खरी दिशा :** राजकीय वातावरण, सभांना मिळणारा प्रतिसाद किंवा सामाजिक माध्यमांवरील चर्चा यांवरून अंतिम निष्कर्ष काढता येत नाही. एखादा पक्ष पुन्हा भरारी घेईल की नाही, हे शेवटी निवडणुकांतील जनादेशावर अवलंबून असते. मतदारांचा कौल हा लोकशाहीतील अंतिम निर्णय असतो.

उद्धव ठाकरे यांच्या पक्षासमोर अजूनही अनेक आव्हाने आहेत. संघटन अधिक मजबूत करणे, नवीन नेतृत्व घडवणे, मतदारांचा विश्वास वाढवणे आणि बदलत्या राजकीय परिस्थितीनुसार रणनीती आखणे. त्याचवेळी पक्षाकडे निष्ठावान कार्यकर्ते, भावनिक पाठिंबा आणि संघर्षातून उभे राहण्याची क्षमता असल्याचे समर्थक मानतात.

## थोडक्यात पण महत्वाचे




### गणेश सुतार यांची भाजपा ओबीसी मोर्चा पुणे शहर उपाध्यक्षपदी निवड

पुणे (आरंभ पर्व) : भाजपा ओबीसी मोर्चा पुणे शहर कार्यकारणीची नुकतीच बैठक संपन्न झाली. पुणे शहराध्यक्ष विकास लवटे यांच्या अध्यक्षतेते खाली झालेल्या या बैठकीमध्ये विविध विषयावर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये पुणे शहर उपाध्यक्षपदी श्री. गणेशभाऊ सुतार यांची निवड करण्यात आली. गणेशभाऊ सुतार अनेक वर्षापासून भारतीय जनता पार्टीचे कार्य करत आहेत. पर्वती विधानसभा मतदारसंघांमध्ये त्यांनी संघटनात्मक काम केले आहे. त्याबद्दल पक्षाच्यावतीने त्यांची उपाध्यक्षपदी फेर नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी शहराध्यक्ष विकास लवटे, सरचिटणीस रमेश गायकवाड , आप्पासाहेब घनवट यशोधन आखाडे, मंगेश शहाणे,नंदकुमार गोसावी, विनोद भाऊ जालगी जीवन शुभदा धामपूरकर,सविता हिंगणे इतर सर्व विविध मान्यवरांनी त्यांचा सत्कार केला व शुभेच्छा दिल्या.

### आरोपीला कोणतीही कायदेशीर पळवाट मिळू नये : काका चव्हाण



पुणे (आरंभ पर्व) : भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून तिची हत्या करण्यात आल्याच्या अत्यंत संतापजनक प्रकरणात विशेष न्यायालयाने आरोपी भीमराव कांबळे (वय ६५) याला फाशीची शिक्षा सुनावली आहे. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयाने यापूर्वी आरोपीला दोषी ठरवले होते. त्यानंतर शिक्षेबाबत सर्वांचे लक्ष लागले असताना न्यायालयाने गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन नराधमाला फाशीची शिक्षा सुनावली. विशेष म्हणजे, गुन्हा घडल्यानंतर अवघ्या दोन महिन्यांच्या आत या प्रकरणाचा निकाल लागल्याने विविध स्तरांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. या निकालाबाबत प्रतिक्रिया देताना नगरसेवक तथा गटनेते काकासाहेब चव्हाण यांनी न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केले. "नसरापूर येथील निष्पाप चिमुरडीवर झालेल्या अमानुष अत्याचारानंतर महाराष्ट्र हादरला होता. अशा संवेदनशील प्रकरणात न्यायालयाने दिलेला हा निर्णय ऐतिहासिक असून पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देणारा आहे," असे ते म्हणाले.

### सोनी पलवर पुन्हा रंगणार रामानंद सागर यांची 'रामायण'




पुणे (आरंभ पर्व) : भारतातील लोकप्रिय विनामूल्य मनोरंजन वाहिनी सोनी पल प्रेक्षकांसाठी पुन्हा एकदा रामानंद सागर यांची अजरामर 'रामायण' मालिका घेऊन येत आहे. ६ जुलैपासून दर सोमवार ते शनिवार रात्री ८ वाजता ही मालिका प्रसारित होणार आहे. १९८७ मध्ये प्रथम प्रसारित झालेल्या 'रामायण' मालिकेने भारतीय दूरचित्रवाणीच्या इतिहासात सांस्कृतिक पर्व घडवले होते. प्रत्येक रविवारी सकाळी संपूर्ण देश या मालिकेसाठी थांबत असे. ७८ भागांच्या या मालिकेने केवळ मनोरंजनच नाही, तर भारतीय संस्कृती, श्रद्धा, भक्ती आणि कौटुंबिक मूल्यांची जपणूक करणारा एक सांस्कृतिक वारसा निर्माण केला. हनुमान आणि यशोमती मय्या या लोकप्रिय भक्तिमय मालिकांच्या यशानंतर आता सोनी पल आपल्या भक्तिपूर्ण कार्यक्रमांच्या मालिकेत आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठत आहे. प्रभू श्रीरामांचे आदर्श जीवन, माता सीतेचा त्याग, लक्ष्मणाची निष्ठा आणि भगवान हनुमानांची अखंड भक्ती यांचे दर्शन घडवणारी ही मालिका आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात मनःशांती, संयम आणि सकारात्मकतेचा संदेश देणारी ठरेल.

### एचडीएफसी बँकेच्या अध्यक्षपदी राजीव कुमार

मुंबई (आरंभ पर्व) : एचडीएफसी बँकेने माजी वित्तीय सेवा सचिव राजीव कुमार यांची अंशकालीन बिगर कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. बँकेच्या संचालक मंडळाने आज झालेल्या बैठकीत या नियुक्तीला मंजुरी दिली. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मंजुरीनंतर तसेच भागधारकांच्या संमतीनंतर ही नियुक्ती प्रभावी होणार आहे.राजीव कुमार यांची जून २०२६ पासून चार वर्षांच्या कालावधीसाठी अतिरिक्त (स्वतंत्र) संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानंतर त्यांची तीन वर्षांच्या कालावधीसाठी अंशकालीन अध्यक्ष म्हणून नियुक्ती होणार असून ती भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मंजुरीच्या अधीन असेल.

# भाजप ओबीसी मोर्चा पुणे शहराची संघटनात्मक बैठक उत्साहात संपन्न

## बैठकीत संघटन बळकटीकरणावर भर, एस आय आर मतदार प्रणाली, महिला सक्षमीकरण यावर चर्चा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा, पुणे शहराची महत्त्वपूर्ण संघटनात्मक बैठक बुधवारी (दि. १ जुलै) सायंकाळी डी.पी. रोड येथील पक्ष कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत संघटन बळकटीकरण, मतदार नोंदणी, दुबार मतदान पडताळणी, तसेच महिला पदाधिकाऱ्यांच्या सक्षमीकरणावर विशेष भर देण्यात आला.







बैठकीचे सूत्रसंचालन ओबीसी मोर्चा महिला अध्यक्षा सौ. शुभदा धम्मापूरकर यांनी केले. प्रारंभी नवनियुक्त तसेच विद्यमान पदाधिकारी आणि सदस्यांचा परिचय करून देण्यात आला. यामुळे सर्वांमध्ये समन्वय वाढवण्यास मदत झाली.

यानंतर ओबीसी मोर्चाचे सरचिटणीस श्री. नंदकुमार गोसावी यांनी मतदार नोंदणी प्रक्रिया, दुबार मतदान पडताळणी आणि संबंधित तांत्रिक बाबींवर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी कार्यकर्त्यांना अचूक माहिती संकलनाचे महत्त्व पटवून दिले.

ओबीसी महिला मोर्चाच्या उपाध्यक्षा सौ. सवित हिंगणे यांनी महिला पदाधिकाऱ्यांना संघटनात्मक कार्यात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. महिलांनी नेतृत्व स्वीकारून संघटन अधिक सक्षम करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सांगितले. त्यानंतर सरचिटणीस श्री. यशोधनजी आखाडे यांनी मतदार व्यवस्थापनाची संकल्पना सोप्या भाषेत स्पष्ट केली. त्यांनी BLO, RO आणि BLA यांच्या भूमिका व जबाबदाऱ्यांची माहिती दिली. प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपल्या मतदारसंघातील कार्यकारिणीची माहिती ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच नवीन मतदार शोधणे आणि त्यांची नोंदणी करणे यावर त्यांनी भर दिला. बैठकीचे अध्यक्षस्थान ओबीसी मोर्चा पुणे शहराध्यक्ष श्री. विकासजी लवटे यांनी भूषविले. त्यांच्या हस्ते महिला मोर्चाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात समाज एकत्रीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले. "पद म्हणजे केवळ सन्मान नसून जबाबदारी आहे. प्रत्येक पदाधिकाऱ्याने पक्षशिस्त आणि समन्वय राखत कार्य करावे," असे त्यांनी सांगितले. पुढील तीन वर्षांत मोठ्या प्रमाणावर नवीन पदाधिकारी जोडण्याचे उद्दिष्ट त्यांनी मांडले. येत्या पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर स्वागत फलक आणि बॅनर्स नियोजनबद्ध पद्धतीने लावण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. बैठकीच्या शेवटी सरचिटणीस श्री. रमेशजी गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले. बैठकीनंतर घोषणांनी परिसर दुमदुमून गेला आणि सर्वांनी नव्या उत्साहाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी यावेळी शहराध्यक्ष विकास लवटे, सरचिटणीस रमेश बापू गायकवाड, यशोधन आखाडे, नंदकुमार गोसावी, महिला अध्यक्ष दमापुरकर यांच्या सर्व विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# गरीब रुग्णांकडून एक रुपयाही जादा वसुली सहन केली जाणार नाही

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील गोरगरीब रुग्णांना आरोग्य योजनांचा संपूर्ण लाभ मिळावा, उपचार प्रक्रियेत पारदर्शकता यावी आणि रुग्णांची आर्थिक फसवणूक थांबावी, या उद्देशाने आमदार शेखर निकम यांनी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात जनहिताचा महत्त्वपूर्ण प्रश्न उपस्थित केला. त्यांच्या मागणीवर उत्तर देताना आरोग्यमंत्री प्रकाश आंबीटकर यांनी, शासनाने निश्चित केलेल्या उपचार पॅकेजच्या बाहेर रुग्णांकडून एक रुपयाही अतिरिक्त रक्कम वसूल केल्यास संबंधित रुग्णालयावर कठोर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट आश्वासन सभागृहात दिले. आमदार निकम यांनी सभागृहात मांडले की, अनेक रुग्णांना आरोग्य योजनेअंतर्गत रुग्णालयात दाखल केल्यानंतर काही दिवसांनी "पाच लाख रुपयांची मर्यादा संपली" असे सांगून पुढील उपचारांसाठी पैसे भरण्यास भाग पाडले जाते. त्यामुळे आधीच संकटात असलेल्या रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांवर मोठा मानसिक आणि आर्थिक ताण येतो. ही परिस्थिती टाळण्यासाठी उपचार सुरू असतानाच रुग्णाला झालेल्या खर्चाचा तपशीलवार लेखाजोखा नियमितपणे उपलब्ध करून द्यावा, त्यावर रुग्ण किंवा नातेवाईकांची स्वाक्षरी घ्यावी आणि संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक करावी, अशी महत्त्वपूर्ण सूचना त्यांनी केली.




- **तक्रार सिद्ध झाल्यास रुग्णालयांवर कठोर कारवाई**
- **आरोग्य योजनांमध्ये पारदर्शकतेसाठी आमदार शेखर निकम यांची विधानसभेत प्रभावी मागणी**
- **आरोग्यमंत्री प्रकाश आंबीटकर यांचे स्पष्ट आश्वासन**

# शिक्षक घडवणाऱ्या परीक्षेचा विश्वासघात

## TET परीक्षा कायमस्वरूपी बंद करण्यात यावी



- **श्री. सुभाष मोहरे जिल्हाध्यक्ष अखिल पुणे जिल्हा प्राथमिक शिक्षक संघ**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"गुरु तो गुरुच राहतो, तो कधीच लहान होत नाही" - पण ज्या परीक्षेतून गुरु घडणार आहेत, तीच परीक्षा जर अप्रामाणिक ठरली तर? 28 जून 2026 रोजी महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा TET 2026 चा पेपर फुटल्याने हीच काळजी प्रत्येकाला सतावत आहे. नीट नंतर आता TET - शिक्षक घडवणाऱ्या यंत्रणेचाच पाया डळमळीत झाला आहे. परीक्षेच्या आदल्या दिवशीच ठाण्याच्या भिवंडी येथे दिल्ली-हरियाणा कनेक्शन असले राजीव शाह, आकाश कुमार आणि धीरज कुमार हे 3 आरोपी 1.5 कोटी रुपयांना पेपर विकण्याच्या प्रयत्नात पकडले गेले. त्यांच्याकडून 4 पेपर सेट, मोबाईल, डेबिट कार्ड जप्त झाले. यामुळे राज्य परीक्षा परिषदेला 4 लाख 28 हजार 122 नोंदणीकृत उमेदवारांसाठी ठेवलेल्या 9,629 परीक्षा केंद्रांवरील परीक्षा रद्द करावी लागली.

पेपरफुटीचा सर्वाधिक फटका बसला तो सामान्य उमेदवारांना. 6-8 महिने नोकरी-घर सांभाळून रात्री जागून अभ्यास करणाऱ्या महिला उमेदवारांचे अश्रू अनावर झाले. 15-20 वर्षे शाळेत शिकवणाऱ्या अनुभवी शिक्षकांनाही 'पात्रता' सिद्ध करण्यासाठी TET द्यावी लागत आहे, हा त्यांचा अपमान आहे. "आम्ही पिढ्या घडवतो, पण आमचीच पात्रता सिद्ध करावी लागते" - ही व्यथा आता संतापात बदलली आहे.यामुळे भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांनी शिक्षक पात्रता परीक्षा कायमस्वरूपी रद्द करण्यात यावी व भविष्यात स्पर्धा परीक्षा घेताना त्या ऑनलाइन घेण्यात याव्यात ऑनलाइन घेत असताना त्यांचा निकाल तात्काळ लगेच एम एस सी आय टी सारखा जाहीर करण्यात यावा उमेदवारांना त्यांची एक प्रत त्यांना देण्यात यावी नाहीतर केंद्रप्रमुख परीक्षेसारखे कोणत्याही प्रकारचा पुरावा मागून उमेदवारांना न मिळाल्याने महाराष्ट्रातील तमाम शिक्षक नाराज असून सदर परीक्षा बाबत शंका निर्माण करत आहेत त्यामुळे शासनाने भविष्यात याबाबत काटेकोरपणे दक्षता घ्यावी अशी विनंती करण्यात येत आहे.

तसेच राज्य परीक्षा परिषदेवरून उमेदवारांचा विश्वास उडाला आहे. 2024 मध्ये कोल्हापूर, 2019 मध्ये इतर राज्यांत झालेल्या पेपरफुटीची पुनरावृत्ती झाली आहे.

उमेदवारांचा प्रवास, राहणे, पुस्तके यावर झालेला खर्च वाया गेला. अनेक गरीब उमेदवारांसाठी हा मोठा धक्का आहे. पेपरफुटीमुळे खऱ्या मेहनतीने अभ्यास करणारा उमेदवार मागे पडतो आणि 'मॅनेज' करणारा पुढे जातो. यामुळे शाळेत जाणारी पिढी अपात्र शिक्षकांच्या हात जाण्याचा धोका आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी SIT स्थापन करून चौकशीचे आदेश दिले आहेत. शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी कठोर कारवाईचे आश्वासन दिले आहे. पण केवळ चौकशी पुरेशी नाही. यासाठी 3 उपाय गरजेचे आहेत: महाराष्ट्र परीक्षा प्रतिबंधक कायदा 2018 मध्ये 'मोक्का' सारख्या तरतुदी करून दोषींना जन्मठेपेची शिक्षा द्यावी.जेणेकरून भविष्यामध्ये कोणताही पेपर फुटणार नाही यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात.पुढील परीक्षा CBT पद्धतीने, AI आधारित CCTV, बायोमेट्रिक तपासणी आणि प्रश्नपत्रिका थेट केंद्रावर डाउनलोड करून घ्यावी.

# सेवायोग फाउंडेशन आणि राजयोग पेंट टीमचा स्तुत्य उपक्रम

## कानिफनाथ गड परिसरात राबवले भव्य स्वच्छता अभियान : ५० स्वयंसेवकांचे श्रमदान; १,००० किलो कचरा संकलित, परिसरात २० डस्टबिन बसवणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सामाजिक बांधिलकी जपत सेवायोग फाउंडेशनच्या वतीने व राजयोग पेंट टीमच्या सहकार्याने रविवारी (दि. २८ जून) ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व असलेल्या कानिफनाथ गड (बापदेव घाट) येथे स्वच्छता अभियान उत्साहात आणि यशस्वीरित्या पार पडले. या मोहिमेत निसर्ग आणि गड संवर्धनाचा दृढ संकल्प करत स्वयंसेवकांनी संपूर्ण परिसर कचरामुक्त केला. या पर्यावरणपूरक उपक्रमामध्ये ५० हून अधिक उत्साही स्वयंसेवकांनी एकत्र येत गडाच्या कानाकोपऱ्यातून प्लास्टिक कचरा, काचेच्या बाटल्या, थर्माकोल, पूजेचे निर्माल्य तसेच इतर टाकाऊ वस्तू गोळा केल्या. सर्वांच्या अथक परिश्रमातून अवघ्या काही तासांत सुमारे १,००० किलो कचरा आणि ५,००० प्लास्टिकच्या बाटल्यांचे संकलन करण्यात आले. गोळा झालेला हा कचरा योग्य विल्हेवाटीसाठी पाठवण्यात आला.




गड परिसर केवळ आजच नाही तर भविष्यातही स्वच्छ आणि सुंदर राहावा, यासाठी सेवायोग फाउंडेशनने एक महत्त्वाचे आणि सकारात्मक पाऊल उचलले आहे. गडावर येणाऱ्या पर्यटकांनी व भाविकांनी कचरा उघड्यावर टाकू नये, यासाठी फाउंडेशनच्या वतीने संपूर्ण गड परिसरात २० डस्टबिन (कचरा कुंड्या) बसविण्यात येणार आहेत. यामुळे या स्वच्छता अभियानाला शाश्वत स्वरूप प्राप्त होणार आहे.

हे अभियान सेवायोग फाउंडेशनचे संस्थापक अक्षय बाबुराव कचरे यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. यात आदित्य ढवळे, अमित तोरमडल, स्वप्नील मुरकुटे, निलेश दगडे यांच्यासह सर्व स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. तसेच, राजयोग पेंट टीमचे रूपेशजी अग्रवाल, प्रथमेश अग्रवाल आणि रॅबीजी अग्रवाल यांनी प्रत्यक्ष श्रमदान करून अभियानात मोलाचे योगदान दिले. 'आदर पूनावाला' समूहाचे तेजस भोसले यांनी तातडीने घंटागाडी उपलब्ध करून दिल्यामुळे या उपक्रमाला मोठी मदत झाली.

सर्वांच्या एकजुटीने, परिश्रमाने आणि सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून हे स्वच्छता अभियान अत्यंत यशस्वी झाले. भविष्यातही अशा समाजोपयोगी आणि पर्यावरणपूरक उपक्रमांच्या माध्यमातून स्वच्छ व सुंदर समाज घडवण्यासाठी सेवायोग फाउंडेशन सातत्याने कटिबद्ध राहील, अशी भावना यावेळी आयोजकांनी व्यक्त केली. फाउंडेशनच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

दैनिक **आरंभपर्व**

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

गुरूवार, दि. ०२ जुलै २०२६









## थोडक्यात पण महत्वाचे



### रोटरी क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीच्या अध्यक्षपदी खत्री; सचिवपदी गाडेकर

जुन्नर (आरंभ पर्व) : रोटरी क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीच्या अध्यक्ष,पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांचा पदग्रहण समारंभ रविवार, दि. २८ रोजी जुन्नर येथे संपन्न झाला. यावेळी प्रशांत खत्री व पवन गाडेकर यांनी अनुक्रमे अध्यक्ष व सचिव पदाची सूत्रे स्वीकारली. या पदग्रहण समारंभास रोटरी भूषण डॉ.सुनील शेवाळे, असिस्टंट गव्हर्नर शिवाजी टाकळकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.तसेच रोटरी सदस्य, जुन्नरचे माजी नगराध्यक्ष, आजी-माजी नगरसेवक, विविध गावचे सरपंच, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रोटरी क्लब ऑफ जुन्नर शिवनेरी समाजोपयोगी सेवा प्रकल्प, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि युवक विकास या क्षेत्रांमध्ये विविध उपक्रम राबविण्याचा मनोदय यावेळी व्यक्त करण्यात आला. नूतन अध्यक्ष प्रशांत खत्री यांनी या वर्षांमध्ये रोटरी क्लब च्या माध्यमातून विविध समाज उपयोगी कार्यक्रम राबवणार असल्याचे सांगितले.यावेळी विनायक कर्पे यांनी रोटरीच्या कार्याबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक मिलिंद घोडेकर यांनी केले विलास कडलाग यांनी सूत्रसंचालन केले. पवन गाडेकर यांनी आभार मानले.

### पावसाने शेतकरी सुखावला : जनावरांना पुरेसा चारा नाही




जुन्नर (आरंभ पर्व) : जुन्नर तालुक्याच्या दुर्गम आदिवासी भागातील आंबे हातविज या भागात पावसाने हजेरी लावल्याने शेतकरी सुखावला आहे. मात्र वैरण कमी असल्याने पाळीव जनावरे रानात सोडावी लागतात मात्र अपुऱ्या पावसामुळे तेथेही जनावरांसाठी चारा नसल्याचे पहावयास मिळत आहे. दर वर्षाप्रमाणे यंदा शेतकरी राजाने भात पेरणी धुळवाफेत केली यानंतर शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत होता. यंदा जून महिन्यात तीन वेळा पाऊस झाला यामुळे भात रोपांना जीवदान मिळाले.पावसाने रोपे तरारली असल्याचे माजी पोलीस पाटील अनंता पारधो यांनी सांगितले. शेतकरी पावसाळी कामात व्यस्त आहे. घर पडाळ शेकारणी तसेच शेतातील पडलेले बांध दुरुस्ती आदी कामे सुरू आहेत. याचबरोबरीने सरपण भरणे पेंडा भरणे ह्या कामात आदिवासी समाज गुंतला आहे.

### ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्यातर्फे नूतन कार्यकारिणीचा सत्कार

पुणे (आरंभ पर्व) : पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वार्षिक निवडणूक २०२६-२७ मध्ये निवडून आलेल्या नूतन कार्यकारिणीचा सत्कार माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या हस्ते उत्साहात पार पडला. यावेळी संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार, चिटणीस तसेच सर्व कार्यकारिणी सदस्य आणि पत्रकार यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेल्या पत्रकारांच्या कार्याचा गौरव करत ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे आहे :अध्यक्ष – श्री. उमेश शेळके उपाध्यक्ष – श्री. योगेश बोरसे, श्री. किशोर बरकले खजिनदार – श्री. प्रसाद पानसे सरचिटणीस – श्री. हिरा सरवदे चिटणीस – श्री. राहुल देशमुख, श्री. संजय सपकाळे कार्यक्रमास पत्रकार बांधव, मान्यवर व ॲड. प्रसन्नदादा जगताप मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. उपस्थितांनी नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन करत पत्रकारांच्या प्रश्नांसाठी संघ अधिक प्रभावीपणे कार्य करेल, असा विश्वास व्यक्त केला.

### वारजेच्या दोन कन्यांची भारतीय व्हॉलिबॉल संघात निवड



पुणे (आरंभ पर्व) : वारजे परिसरासाठी अभिमानाची बाब ठरावी अशी मोठी कामगिरी घडली आहे. वारजे येथील अमृता गणेश हिंगे आणि रिष्मा रमेश शेट्टी, या सचिन दोडके व्हॉलिबॉल अकॅडेमीच्या होतकरू खेळाडूंची चीन येथे होणाऱ्या ISF World School Games हॉलीबॉल चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी भारतीय व्हॉलिबॉल संघात निवड झाली आहे. वारजे येथील असणाऱ्या अमृता आणि रिष्मा यांनी सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द, शिस्तबद्ध सराव आणि उत्कृष्ट खेळाच्या जोरावर ही मानाची निवड मिळवली आहे. त्यांच्या या यशामागे प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि अकॅडेमीचे दर्जेदार प्रशिक्षण महत्त्वाचे ठरले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल नगरसेवक सचिन दोडके यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन केले. "वारजेच्या या दोन्ही कन्यांनी देशासाठी खेळण्याचा मान मिळवून परिसराची मान उंचावली आहे. आगामी स्पर्धेत त्या उत्कृष्ट कामगिरी करून भारताला यश मिळवून देतील, असा विश्वास आहे," असे त्यांनी सांगितले. या निवडीमुळे वारजे परिसरासह संपूर्ण सचिन दोडके व्हॉलिबॉल अकॅडेमीमध्ये आनंदाचे वातावरण असून विविध स्तरांतून दोन्ही खेळाडूंवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### निलेश कुळये व तृप्ती भोसले सिंहगड एपिक ट्रेल मॅरेथॉनचे विक्रमी विजेते



पुणे (आरंभ पर्व) : वेस्टर्न घाट्स रनिंग फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पाचव्या सिंहगड एपिक ट्रेल आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेत ४२ किलोमीटर गटात रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा येथील निलेश कुळये आणि पुण्याच्या तृप्ती भोसले यांनी अनुक्रमे पुरुष व महिला गटात प्रथम क्रमांक पटकावत विक्रमी विजेतेपदावर नाव कोरले. सिंहगडाच्या पायथ्याशी शनिवारी (२७ जून) पार पडलेल्या या स्पर्धेत जगातील ५ देश, भारतातील २६ राज्ये आणि ६५ शहरांतील सुमारे १२०० धावपटूंनी सहभाग घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यासाठी प्राणार्पण करणारे सुभेदार नरवीर तानाजी मालुसरे, श्रीमंत कान्होजीराजे जेधे देशमुख, सरनोबत नरवीर पिलाजी गोळे तसेच सर्व शूर मावळ्यांना ही स्पर्धा समर्पित करण्यात आली होती. इंटरनॅशनल ट्रेल रनिंग असोसिएशनशी संलग्न असलेल्या या स्पर्धेत ११, २१, ३० आणि ४२ किलोमीटर अशा चार गटांमध्ये धावपटूंनी सिंहगडाच्या पाच विविध वाटांवरून आव्हानात्मक धाव पूर्ण केली. डोंगर-दऱ्या, चिखल, कडे-कपाऱ्या आणि दुर्गम वाटांमधून पार पडणाऱ्या या माउंटन ट्रेल मॅरेथॉनद्वारे पर्यावरण संरक्षण, गड-किल्ल्यांचे संवर्धन, पुरातन वास्तूंचे जतन आणि नियमित व्यायामाचा संदेश देण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष दिग्विजय जेधे यांनी दिली.

# वडिलांचे निधन : मुरलीधर मोहोळ यांची जनसेवा सुरूच

**पुणे-लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**



जीवनात काही प्रसंग असे असतात, जे कोणत्याही व्यक्तीला आतून हादरवून टाकतात. आई-वडिलांचे निधन हे प्रत्येकाच्या आयुष्यातील सर्वात मोठे आणि भरून न येणारे दुःख असते. अशा वेळी मन सुन्न होते, शब्द हरवतात आणि कुटुंबाला आधार देणे हीच सर्वात मोठी जबाबदारी बनते. परंतु जनतेने दिलेल्या विश्वासाला आणि कर्तव्याला सर्वोच्च मानणारे केंद्रीय हवाई वाहतूक, सहकार राज्यमंत्री तथा पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी या कठीण प्रसंगातही जनसेवेची परंपरा खंडित होऊ दिली नाही.

वडिलांच्या निधनाचे दुःख मनात असतानाही त्यांच्या जनसंपर्क कार्यालयातील कामकाज नेहमीप्रमाणे सुरू राहिले. नागरिकांच्या अडचणी, विविध शासकीय कामांचा पाठपुरावा, सर्वसामान्यांच्या प्रश्नांचे निराकरण आणि जनतेशी असलेला सातत्यपूर्ण संवाद यामध्ये कोणताही खंड पडू दिला गेला नाही. वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून जनतेच्या सेवेला प्राधान्य देण्याचा त्यांचा निर्णय अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. याशिवाय खासदार जनसंपर्क सेवा शिबिरामध्ये त्यांनी उपस्थिती लावून जनतेचे प्रश्न जाणून घेतले आहेत. सार्वजनिक जीवनात पद मिळवणे सोपे असते; मात्र त्या पदाची जबाबदारी संकटाच्या काळातही तितक्याच प्रामाणिकपणे पार पाडणे हेच खरे नेतृत्व असते. वैयक्तिक आयुष्यातील मोठ्या दुःखाच्या छायेतही जनतेच्या सेवेसाठी स्वतःला समर्पित ठेवण्याची भूमिका मुरलीधर मोहोळ यांनी कृतीतून दाखवून दिली आहे.

राजकारणात अनेकदा आश्वासने दिली जातात, परंतु संकटाच्या प्रसंगी कर्तव्य निभावणारे नेतेच लोकांच्या मनात कायमचे स्थान निर्माण करतात. दुःख कितीही मोठे असले तरी जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ नये, ही भावना त्यांच्या प्रत्येक कृतीतून दिसून आली. त्यामुळे अनेक नागरिक, कार्यकर्ते आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्या कर्तव्यनिष्ठेचे कौतुक होत आहे.

आजच्या काळात समाजाला अशाच संवेदनशील, जबाबदार आणि कर्तव्याला सर्वोच्च मानणाऱ्या नेतृत्वाची गरज आहे. वैयक्तिक वेदना हृदयात ठेवूनही जनसेवेचा ध्यास न सोडणारे मुरलीधर मोहोळ यांचे हे कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## मेडिकव्हर हॉस्पिटल्स : एका वर्षात १६वे यशस्वी लिव्हर ट्रान्सप्लांट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




प्रगत अवयव प्रत्यारोपण सेवांमध्ये आणखी एक महत्त्वपूर्ण यश संपादन करत मेडिकव्हर हॉस्पिटल्स, पुणे यांनी गेल्या एका वर्षातील सलग 16 वे यशस्वी लिव्हर ट्रान्सप्लांट पूर्ण केले आहे. या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे यकृताच्या गंभीर आजाराने त्रस्त असलेल्या 63 वर्षीय रुग्णाला नवजीवन मिळाले असून तो आता निरोगी आणि सक्रिय आयुष्य जगत आहे. सदर रुग्णाला 2023 मध्ये डिकॉम्पेन्सेटेड क्रॉनिक लिव्हर डिसीज (DCLD) असल्याचे निदान झाले होते. त्यांना तीव्र कावीळ, दोन्ही पायांमध्ये सूज आणि पोटात मोठ्या प्रमाणात पाणी साचणे (ॲसाइटिस) अशा गंभीर लक्षणांचा सामना करावा लागत होता. यकृताचे कार्य सातत्याने खालावत असल्यामुळे पोटातील अतिरिक्त द्रव काढण्यासाठी त्यांना महिन्यातून तीन ते चार वेळा 'ॲसाइटिक टॅपिंग' ही प्रक्रिया करावी लागत होती.

## जनतेच्या हक्कासाठी अविरत लढणाऱ्या संघर्षयोद्ध्यास शुभेच्छा!

**शब्दांकन : नितीन घोलप**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



काही व्यक्ती पदामुळे मोठ्या होत नाहीत, तर त्यांच्या कार्यामुळे जनमानसात अढळ स्थान निर्माण करतात. समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या स्वतःच्या समजून त्या सोडविण्यासाठी आयुष्य वाहणारे, अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहणारे आणि जनहितासाठी सातत्याने संघर्ष करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे माननीय श्री रोहिदासभाऊ जोरी पाटील.

आपल्या हक्काच्या रस्त्यासाठी सुरू झालेल्या लढ्याला दिशा देताना त्यांनी गेली अनेक वर्षे निस्वार्थपणे जनतेचा आवाज बनून काम केले. मुंबई उच्च न्यायालयापासून ते पीएमआरडीए, पुणे महानगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय, नगरविकास विभाग आणि विविध शासकीय कार्यालयांपर्यंत सातत्याने पाठपुरावा करून नागरिकांच्या हक्कासाठी त्यांनी संघर्षाची मशाल तेवत ठेवली. हा संघर्ष केवळ एका रस्त्यापुरता मर्यादित नसून, तो जनतेच्या न्याय्य हक्कांसाठीचा लढा आहे.

त्यांच्या कार्यामागे कोणत्याही पदाची किंवा प्रसिद्धीची अपेक्षा नसून, समाजाप्रती असलेली प्रामाणिक बांधिलकी आहे. म्हणूनच नागरिकांच्या मनात त्यांच्याबद्दल आदर, विश्वास आणि आपुलकी निर्माण झाली आहे. संघर्ष, संयम, चिकाटी आणि लोकहिताची जाणीव हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे खरे अलंकार आहेत.

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, सुख, समृद्धी आणि समाजसेवेचे अखंड बळ लाभो, हीच आई तुळजाभवानीच्या चरणी प्रार्थना. त्यांनी हाती घेतलेल्या प्रत्येक जनहिताच्या कार्याला यश लाभो आणि त्यांच्या कार्यातून समाजाला अशीच प्रेरणा मिळत राहो, हीच सदिच्छा.

वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

# धायरी फाटा येथे रस्त्यावर कचऱ्याचे साम्राज्य

## महापालिकेच्या दुर्लक्षामुळे नागरिक संतप्त



**संपादकीय टिप्पणी**

'इथे कचरा टाकू नये' असे फलक लावून स्वच्छता साध्य होत नाही. नागरिकांना कचरा नेमका कुठे टाकायचा, याची स्पष्ट व्यवस्था आणि माहिती देणे अधिक गरजेचे आहे. बंदी घालण्यापेक्षा योग्य पर्याय उपलब्ध करून दिल्यास स्वच्छतेत नागरिकांचा सहभाग वाढेल. 'कचरा टाकू नका' एवजी 'कृपया कचरा येथे टाका' हा सकारात्मक संदेश देण्याची वेळ आता आली आहे. **- प्रतिक गंगणे, पुणे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

धायरी फाटा येथील सणस विद्यालयाशेजारील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात असून परिसरात दुर्गंधी आणि अस्वच्छतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या समस्येकडे पुणे महानगरपालिकेचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. गेल्या काही दिवसांपासून येथे कचऱ्याचे ढीग वाढतच चालले असून त्याची वेळेवर विल्हेवाट लावली जात नसल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे.

रस्त्याच्या कडेला साचलेल्या कचऱ्यामुळे ये-जा करणाऱ्या नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः शाळेत जाणाऱ्या लहान मुलांना या अस्वच्छतेचा मोठा फटका बसत असून त्यांच्या आरोग्यावरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दुर्गंधी, मोकाट जनावरे आणि रोगराई पसरण्याची भीतीही नागरिकांनी व्यक्त केली आहे. काही ठिकाणी कचऱ्यामुळे रस्ता अडथळलेला दिसून येत असून वाहतुकीलाही अडचणी निर्माण होत आहेत.

स्थानिक रहिवाशांनी अनेक वेळा संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या असल्या तरी त्यावर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, अशी नाराजी व्यक्त केली जात आहे. "आणखी किती दिवस हा त्रास सहन करायचा?" असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांनी उपस्थित करत, संबंधित विभागाने तातडीने कचरा हटवून नियमित स्वच्छतेची व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे. तसेच भविष्यात अशा प्रकारची समस्या उद्भवू नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचीही मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## भारतीय दर्शनशास्त्रातील विश्लेषणात्मक दृष्टीकोन अंगिकारा : नीलेश ओक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



पाश्चात्त्यांनी बिंबवलेल्या कालखंडाहूनही भारतीय उपखंडाचा इतिहास व संस्कृती प्राचीन आहे. आपल्या वेद, उपनिषदे, दर्शने तसेच महाकाव्यांतून मिळणारे खगोलशास्त्रीय पुरावे, त्यातील नेमकेपणा, प्रगत नौकानयन आणि समृद्ध कृषीक्षेत्र, याद्वारा प्राचीन भारतीय उपखंडाची समृद्धी अधोरेखित होते. दर्शनशास्त्रांत सांगितलेला वैज्ञानिक तसेच विश्लेषणात्मक दृष्टीकोन स्वीकारला, तर डायनॅमिक भारत २०४७ नक्कीच दृष्टीपथात येईल, असे प्रतिपादन प्राचीन भारतीय इतिहास संशोधक नीलेश ओक यांनी रविवारी सायंकाळी येथे केले. पाश्चात्त्यांचे तेवढे सगळे उत्तम, विज्ञानसिद्ध हे मानणारी कॉपी – पेस्ट पद्धत आपण सोडली पाहिजे आणि प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेचा मागोवा घेतला पाहिजे, असेही ते म्हणाले. नागरीक सोशल फाऊंडेशनने ॲम्बिशन्स कॉमर्स इन्स्टिट्यूटच्या सहकार्याने आयोजित केलेल्या डायनॅमिक भारत २०४७ या विषयावरील विशेष व्याख्यानप्रसंगी ओक बोलत होते. याप्रसंगी ॲम्बिशन्सचे संचालक कौस्तुभ अत्रे, वक्ता विभाग प्रमुख दीपक मेहेंदळे,फाऊंडेशनचे विश्वस्त अमेय सप्रे, संचालक प्रीतम थोरवे, चंद्रशेखर यादव आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. भारतमातेच्या प्रतिमापूजनाने आणि पुष्कराज सप्रे यांनी गायिलेल्या वंदेमातरम् प्रार्थनेसह दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरवात झाली.

## लोककलावंतांना राजाश्रयाची गरज

### समरसता लोककला संमेलनामध्ये लोककलावंतांची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



महाराष्ट्रामध्ये शेकडो वर्षांपासून लावणी, तमाशा, गवळण ,भारुड ,पोवाडा आदी विविध प्रकारच्या लोककला सादर होत आहेत. या लोककलांनी महाराष्ट्राचे जगणे आणि संस्कृती समृद्ध केले आहेत. या लोककला महाराष्ट्राची ओळख आणि वैभव झाले आहेत परंतु या कला सादर करणारे लोककलावंत मात्र अद्याप अनेक समस्यांना तोंड देत आहेत. लोककलावंत टिकले तरच खऱ्या अर्थाने लोककला टिकेल लोककलावंतांना आधार देण्यासाठी लोकांच्या पाठिंबाबरोबरच सरकारने आधार देऊन त्यांना राजश्रय देण्याची गरज आहे असे मत ज्येष्ठ लोककलावंतांनी केली. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचालनालय आणि समरसता साहित्य परिषदेतर्फे पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या समरसता लोककला संमेलनामध्ये जेष्ठ लोककलावंतांनी आपली भावना व्यक्त केली . ज्येष्ठ नृत्यांगना मंगला बनसोडे, सुरेखा पुणेकर, ज्येष्ठ गायक नंदेश उमप , जयमला इनामदार, पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रचे प्रमुख प्रवीण भोळे आदी चर्चासत्रामध्ये सहभागी झाले होते.

## क्राफ्टन इंडियाची 'रायझिंग स्टार इन्विटेशनल' स्पर्धा सुरू

### भारतातील नव्या बीजीएमआय खेळाडूंना मोठे व्यासपीठ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




भारतातील ई-स्पोर्ट्स क्षेत्राला नवे बळ देण्यासाठी क्राफ्टन इंडियाने 'रायझिंग स्टार इन्विटेशनल' या देशातील पहिल्या बीजीएमआय इन्विटेशनल स्पर्धेची घोषणा केली आहे. ३ ते ५ जुलैदरम्यान होणाऱ्या या तीन दिवसीय स्पर्धेत क्राफ्टन इंडिया ई-स्पोर्ट्स रायझिंग स्टार्स कार्यक्रमातील १६ उदयोन्मुख खेळाडू आपल्या संघांचे नेतृत्व करणार असून, ₹५ लाखांच्या बक्षीसासाठी चुरशीची लढत रंगणार आहे.

या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक रायझिंग स्टार कर्णधाराच्या संघात भारतातील नामांकित व्यावसायिक बीजीएमआय खेळाडूंचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे नवोदित खेळाडूंना अनुभवी खेळाडूंसोबत खेळण्याबरोबरच नेतृत्व कौशल्य दाखवण्याचीही संधी मिळणार आहे. क्राफ्टन इंडियाने २०२६ मध्ये रायझिंग स्टार्स कार्यक्रमाचा विस्तार करत दुसऱ्या गटाची घोषणा केली होती. प्रशिक्षित मार्गदर्शन, स्पर्धात्मक अनुभव आणि राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेला हा कार्यक्रम भारतातील तळागाळातील ई-स्पोर्ट्स प्रतिभेला प्रोत्साहन देणारा महत्त्वाचा उपक्रम मानला जात आहे. याबाबत बोलताना क्राफ्टन इंडिया ई-स्पोर्ट्सचे सहयोगी संचालक करण पाठक म्हणाले, "रायझिंग स्टार इन्विटेशनल ही भारतातील पुढील पिढीतील व्यावसायिक बीजीएमआय खेळाडूंना स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची मोठी संधी आहे. अनुभवी खेळाडूंसोबत नेतृत्व करत स्पर्धा खेळण्याचा अनुभव त्यांच्या कारकिर्दीसाठी महत्त्वाचा ठरेल."

## थोडक्यात पण महत्वाचे



### खडकवासला आरोग्य केंद्र येथे पोलिओ लसीकरण

खडकवासला (आरंभ पर्व) : खडकवासला येथे पुणे महानगरपालिका आरोग्य केंद्र येथे पोलिओ लसीकरण करण्यात आले. यावेळी ओबीसी मोर्चा सरचिटणीस रमेश बापू गायकवाड, मंडलाध्यक्ष विजय मते, जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते, अजय मते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये लसीकरण करण्यात आले.



### कुत्र्यांच्या हल्ल्यातून चौशिंग्याला जीवनदान; तरुणांची तत्परत

धायरी (आरंभ पर्व) : धायरी गावातील रायकर मळा परिसरात कुत्र्यांच्या पाठलागामुळे बिथरलेले एक चौशिंगा (हरीण) लोकवस्तीत शिरल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. जीवाच्या भीतीने हे दुर्मिळ वन्यप्राणी सैरावैरा पळत असताना धायरीतील तरुणांनी धाडस आणि तत्परता दाखवत त्याची सुखरूप सुटका केली. सामाजिक कार्यकर्ते दत्तानाना रायकर, कल्याण पायगुडे, सुरज सरतापे, अनिकेत पोळेकर, समीर सरतापे, नितीन शिंदे आणि हनुमंत रायकर यांनी अत्यंत संयमाने चौशिंग्याला सुरक्षितरीत्या ताब्यात घेतले. त्यानंतर संबंधित रेस्क्यू टीम घटनास्थळी दाखल झाल्यानंतर या वन्यप्राण्याला त्यांच्या ताब्यात सुखरूप देण्यात आले. स्थानिक नागरिकांनी तरुणांच्या धाडसाचे व संवेदनशीलतेचे कौतुक केले. वेळेवर मदत मिळाल्यामुळे चौशिंग्याचा जीव वाचला असून त्याला सुरक्षित अधिवासात सोडण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यात आली.

### राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेस उत्तमनगर येथे प्रतिसाद



पुणे (आरंभ पर्व) : राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत प्रभाग क्र. ३३ मधील उत्तमनगर येथे भाजपा नगरसेवक सुभाष नाणेकर यांच्या जनसंपर्क कार्यालयात लसीकरण केंद्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी मा. सुभाष नाणेकर यांच्या हस्ते लहान बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. या उपक्रमास प्रभाग ३३, उत्तमनगर तसेच परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अनेक माता आपल्या लहान बालकांसह लसीकरणासाठी उपस्थित राहिल्या. यावेळी जनसेवक मा. गणेशभाऊ गवांडे (पाटील), भाजपा खडकवासला पर्यावरण आघाडीचे उपाध्यक्ष मा. रमेशभाऊ कांबळे, उद्योजक मा. गणेशभाऊ दगडे, मा. परागजी कांबळे तसेच पुणे महानगरपालिकेच्या महिला कर्मचारी व आरोग्य विभागातील सेवकवर्ग उपस्थित होते. यावेळी सर्व पालकांनी आपल्या पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब अवश्य पाजून राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेला सहकार्य करण्याचे आवाहन नगरसेवक सुभाष नाणेकर यांनी केले.

### खडकवासला येथे राष्ट्रीय पल्स पोलिओ अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद



पुणे (आरंभ पर्व) : राष्ट्रीय पल्स पोलिओ अभियानांतर्गत खडकवासला शासकीय दवाखाना येथे आयोजित लसीकरण मोहिमेस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका धनश्री कोल्हे यांनी अभियानाला भेट देऊन लहान बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजत मोहिमेची सुरुवात केली. अभियानादरम्यान आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी, आशा सेविका तसेच मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. आपल्या चिमुकल्यांना पोलिओसारख्या गंभीर आजारापासून सुरक्षित ठेवण्यासाठी पालकांनी उत्साहाने सहभाग नोंदवत बालकांना पोलिओचे डोस पाजले. या प्रसंगी भाजपा ओबीसी प्रदेश सचिव दत्ताभाऊ कोल्हे, डॉ. शबदा शिरपूरकर (एमबीबीएस, वैद्यकीय अधिकारी) तसेच डॉ. संगीता गुरव (एमबीबीएस, वैद्यकीय अधिकारी) यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान यशस्वीरीत्या पार पडले. यावेळी "प्रत्येक बालकाला पोलिओचे दोन थेंब पोलिओमुक्त भारतासाठी आपले योगदान," असा संदेश देत सर्व पालकांना आपल्या पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला पोलिओचा डोस देण्याचे आवाहन सौ.कोल्हे यांनी केले.

### नऱ्हे येथे राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम



नऱ्हे (आरंभ पर्व) : राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत रविवारी (दि. २८ जून) नऱ्हे परिसरात पाच वर्षांखालील बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्यात आले. आरोग्य विभागाच्या वतीने आयोजित या मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. लसीकरण केंद्रावर पालकांनी आपल्या पाल्यांना मोठ्या संख्येने आणून पोलिओचे डोस दिले. भारताचे पोलिओमुक्त स्थान कायम राखण्यासाठी प्रत्येक बालकाला पल्स पोलिओचे दोन थेंब देणे आवश्यक असल्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले. यावेळी भाजप प्रभाग क्र. ३४ अध्यक्ष राजू कुटे यांच्या हस्ते लसीकरण करण्यात आले. त्यांनी उपस्थित पालकांशी संवाद साधत प्रत्येक पाच वर्षांखालील बालकाचे लसीकरण करून घेण्याचे आवाहन केले. तसेच आरोग्य विभागाच्या अधिकारी, कर्मचारी आणि आशा स्वयंसेविकांच्या कार्याचे कौतुक केले.

# अक्षय इंगळे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर





> “गेल्या अनेक वर्षापासून माझा वाढदिवस समाजसेवेला समर्पित करण्याचा प्रयत्न करत आहे. रक्तदानामुळे अनेक अनोळखी व्यक्तींना जीवनदान मिळते, यापेक्षा मोठा आनंद दुसरा नाही. आज 936 रक्तपिशव्यांचे संकलन झाले, हीच माझ्यासाठी सर्वात मोठी वाढदिवसाची भेट आहे. भविष्यातही समाजोपयोगी उपक्रम अधिक जोमाने राबवत राहीन. सर्व रक्तदाते व शुभेच्छा देणाऱ्या सर्व हितचिंतकांचा आभारी आहे"
>
> **- अक्षय इंगळे, मा. उपसरपंच नऱ्हेगाव**

**नऱ्हे (दै. आरंभ पर्व)**

वाढदिवस हा केवळ आनंदाचा दिवस नसून समाजाचे ऋण फेडण्याची संधी असते, या विचाराने प्रेरित होऊन नऱ्हे गावचे माजी उपसरपंच तथा युवा सामाजिक कार्यकर्ते अक्षय इंगळे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या भव्य रक्तदान शिबिरात तब्बल 936 रक्तपिशव्यांचे संकलन झाले. नऱ्हे गावाच्या इतिहासातील हे आजवरचे सर्वाधिक रक्तसंकलन ठरले आहे.

## ९३६ रक्तपिशव्यांचे विक्रमी संकलन

विशेष म्हणजे, गेल्या सलग पाच वर्षांपासून अक्षय इंगळे आपल्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करत आहेत. त्यांच्या या उपक्रमामुळे हजारो रक्तपिशव्या संकलित झाल्या असून, असंख्य गरजू रुग्णांना जीवनदान मिळाले आहे. रक्तदानासोबतच शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, युवकांना प्रोत्साहन आणि विविध सामाजिक उपक्रमांमध्येही त्यांचे योगदान उल्लेखनीय राहिले आहे. त्यामुळे नऱ्हे परिसरात ते सामाजिक बांधिलकी जपणारे नेतृत्व म्हणून ओळखले जातात.

यंदाच्या रक्तदान शिबिरालाही नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रक्तदात्यांचा उत्साह वाढविण्यासाठी आयोजकांनी आकर्षक लकी ड्रॉचे आयोजन केले होते. यामध्ये इलेक्ट्रिक बाईक, वॉशिंग मशीन, कुलर आणि मायक्रोवेव्ह ओव्हन अशी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली होती.

यामध्ये महादेव निकम यांना इलेक्ट्रिकल बाईक तसेच अनुक्रमे 2) योगेश डोइफोडे 3) ओम पाटील 4) केतन काने 5) गोरखनाथ पाटील अशी लकी ड्रॉमध्ये बक्षिसे मिळाली. या यशस्वी उपक्रमासाठी कुणाल इंगळे तसेच मित्रपरिवाराने विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी कुणाल इंगळे मित्र परिवार, जय गणेश मित्र मंडळ आणि ओम नमः शिवाय प्रतिष्ठान यांच्या कार्यकर्त्यांनी मोलाचे योगदान दिले.यावेळी नगरसेवक हरिदास चरवड, नगरसेवक व्यंकोजी खोपडे, नगरसेविका अनिता इंगळे, जयश्री भूमकर, माजी उपसरपंच सुशांत कुटे, सागर भूमकर, सारंग नवले, आंबेगावचे माजी उपसरपंच अनिल कोंढरे, माजी सरपंच पोपटराव खेडेकर, भाजप प्रभागाध्यक्ष राजू कुटे, बापूसाहेब पोकळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर दळवी आणि राज शिनारे यांनी केले.

# पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या निवडणुकीत उमेश शेळके अध्यक्ष

## हिरा सरवदे सरचिटणीसपदी बिनविरोध



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या सन २०२६-२०२७ या वर्षासाठी झालेल्या वार्षिक निवडणुकीत दै. सकाळचे उमेश शेळके यांनी अध्यक्षपदाची निवडणूक जिंकत संघाचे नेतृत्व आपल्या हाती घेतले. तर दै. लोकमतचे हिरा सरवदे यांची सरचिटणीसपदी बिनविरोध निवड झाली. खजिनदारपदी महाराष्ट्र टाइम्सचे प्रसाद पानसे यांनी विजय मिळविला. पत्रकार संघाच्या निवडणुकीकडे शहरातील पत्रकारितेच्या क्षेत्राचे लक्ष लागले होते. विविध वृत्तसंस्था आणि माध्यमांतील पत्रकारांनी या निवडणुकीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. मतदानानंतर झालेल्या मतमोजणीत अध्यक्षपदी उमेश शेळके यांना स्पष्ट बहुमत मिळाले. त्यांच्या विजयानंतर समर्थकांनी जल्लोष करत त्यांचे अभिनंदन केले. उपाध्यक्षपदी पुढारीचे किशोर बरकाले आणि टीव्ही ९ चे योगेश बोरसे यांची निवड झाली. सरचिटणीसपदी हिरा सरवदे यांची बिनविरोध निवड झाल्याने त्यांच्या कार्याचा सन्मान झाल्याची भावना सदस्यांनी व्यक्त केली. खजिनदारपदी प्रसाद पानसे यांनी विजय मिळवित आर्थिक जबाबदारी स्वीकारली.

चिटणीसपदी दै. भास्करचे राहुल देशमुख आणि लोकसत्ताचे संजय सपकाळे यांची निवड झाली. नव्या कार्यकारिणीत विविध वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यांतील पत्रकारांना प्रतिनिधित्व मिळाले आहे.

कार्यकारिणी सदस्य म्हणून सुशांत राऊत (टीव्ही ९), ज्ञानेश्वर फड (प्रभात), उद्धव धुमाळे (लोकमत), अक्षयकुमार फाटक (नवभारत/नवराष्ट्र), तुषार झरेकर (पुढारी न्यूज), गोपाळ गुरव (महाराष्ट्र टाइम्स), दीपक होमकर (तरुण भारत), मिलिंद शुक्ल (प्रभात), मनोजकुमार मोरे (लोकसत्ता) आणि सचिन वाघमारे (सकाळ) यांची निवड झाली.

निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि पारदर्शक पद्धतीने पार पडली. मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. प्रताप परदेशी यांनी संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचे नियोजन केले, तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. स्वप्नील जोशी यांनी त्यांना सहकार्य केले.

निवडीनंतर नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांवर पत्रकारांच्या व्यावसायिक हितांचे संरक्षण, पत्रकार कल्याणविषयक प्रश्नांना प्राधान्य, संघटनेची एकजूट अधिक बळकट करणे, प्रशिक्षण उपक्रम, सामाजिक उपक्रम तसेच पत्रकारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर प्रभावीपणे पाठपुरावा करण्याची जबाबदारी असणार आहे. नव्या कार्यकारिणीचे विविध पत्रकार संघटना, ज्येष्ठ पत्रकार आणि सदस्यांकडून अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या कार्यकाळाकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहेत.

# शिवजन्मभूमीतील कर्नल विक्रम बेनके ब्रिगेडियरपदी नियुक्त

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**




शिवजन्मभूमीतील कर्नल विक्रम सुधीर बेनके यांची भारतीय सैन्यदलात ब्रिगेडियर पदावर नियुक्ती झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल जुन्नर तालुक्यासह विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे. ब्रिगेडियर विक्रम बेनके यांच्या यशाबद्दल शेतकरी संघटनेचे नेते तानाजी बेनके, माजी आमदार स्व. वल्लभ बेनके यांच्या पत्नी राजश्री बेनके, माजी आमदार अतुल बेनके, जुन्नर तालुका पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष अमित बेनके, डॉ. अमोल बेनके, गौरी बेनके, धनश्री बेनके, डॉ. पल्लवी बेनके, योगेश बेनके, सुधीर फुलवडे, डॉ. फुलवडे आणि दयानंद डुंबरे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# १२ वर्षांपासून प्रलंबित ड्रेनेज लाईनच्या कामाला अखेर सुरुवात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

उत्तमनगर येथील मनीषा थिएटर लेन परिसरातील रहिवासी श्री. दीपक राऊत यांच्या तक्रारीची तात्काळ दखल घेत तब्बल १२ ते १३ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या ड्रेनेज लाईनच्या कामाला आज प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली.

या परिसरातील नागरिकांना अनेक वर्षांपासून सांडपाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत होते. ड्रेनेजची योग्य व्यवस्था नसल्याने सांडपाणी थेट घरांमध्ये शिरत होते. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. श्री. दीपक राऊत यांनी नगरसेविका



धनश्री कोल्हे यांच्या कोंढवे-धावडे जनसंपर्क कार्यालयात अर्ज सादर केला. त्यानंतर अवघ्या दोन दिवसांत मा. धनश्री कोल्हे यांनी आपल्या निधीतून या कामास मंजुरी देत कामाचे भूमिपूजन करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. यावेळी दत्ता भाऊ कोल्हे (ओबीसी मोर्चा पश्चिम महाराष्ट्र सचिव),विजय मते (शिवणे-धायरी मंडल अध्यक्ष), मनिषा मोरे (महिला मोर्चा मंडल अध्यक्ष), रमेशबापू गायकवाड (ओबीसी मोर्चा पुणे शहर चिटणीस), निखिल धावडे (युवा मोर्चा मंडल अध्यक्ष), अजय मते (खडकवासला उपाध्यक्ष), अजयजी बाबर, अशिषजी कनोजिया, संतोषजी दरेकर (पर्यावरण आघाडी अध्यक्ष), रमेश कांबळे, गणेश गवांडे,राधा कनोजिया, सायली भोसले तसेच इतर पदाधिकारी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फुटणारा भारत

**"तुम्ही राजीनामे मागत राहा, पण पेपर असेच फुटत राहतील..." ही आजच्या व्यवस्थेची शोकांतिका बनली आहे. प्रत्येक पेपरफुटीनंतर संताप व्यक्त होतो, आंदोलने होतात, राजीनाम्यांची मागणी होते, चौकशी समित्या नेमल्या जातात; पण काही दिवसांनी पुन्हा एखाद्या नव्या भरती परीक्षेचा पेपर फुटल्याची बातमी समोर येते. प्रश्न असा आहे की, दोषी बदलतात की फक्त चेहरे?**




**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

आज भारतात सर्वाधिक फुटत असेल तर तो विश्वास आहे. जाती-धर्माच्या नावावर समाज फुटतो, राजकारणात पक्ष फुटतात, आमदार फुटतात, खासदार फुटतात आणि त्याच वेळी विद्यार्थ्यांच्या भविष्यालाही पेपरफुटीने तडे जातात. ही केवळ योगायोगांची मालिका नाही; तर व्यवस्थेतील कमकुवतपणाचे आणि जबाबदारीच्या अभावाचे प्रतीक आहे.

एका विद्यार्थ्याने स्पर्धा परीक्षेसाठी वर्षानुवर्षे केलेला अभ्यास, कुटुंबाने घेतलेले कष्ट, आर्थिक त्याग आणि भविष्याची स्वप्ने एका पेपरफुटीने क्षणात उद्ध्वस्त होतात. त्यानंतर परीक्षा रद्द होते, पुन्हा परीक्षा घेतली जाते; पण त्या विद्यार्थ्याच्या मानसिक तणावाची, आर्थिक नुकसानीची आणि गेलेल्या वेळेची भरपाई कोण करणार?

दुर्दैव म्हणजे प्रत्येक वेळी चर्चा व्यक्तींवर जास्त होते आणि व्यवस्थेवर कमी. राजीनाम्याची मागणी हा लोकशाहीतील योग्य मार्ग असू शकतो; पण केवळ राजीनाम्यांनी पेपरफुटी थांबली असती, तर आज ही समस्या इतिहासजमा झाली असती. गरज आहे ती संपूर्ण परीक्षा प्रणाली अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि उत्तरदायी करण्याची.

पेपर छापण्यापासून ते परीक्षा केंद्रापर्यंत प्रत्येक टप्प्यावर तंत्रज्ञानाधारित सुरक्षा, स्वतंत्र देखरेख, कठोर शिक्षा आणि जलद न्यायप्रक्रिया यांची अंमलबजावणी झाली, तरच या गुन्ह्यांना आळा बसेल. अन्यथा प्रत्येक नवीन भरतीसोबत विद्यार्थ्यांच्या मनात एकच प्रश्न उभा राहील. "यावेळी तरी पेपर सुरक्षित राहणार का?"

देशाची खरी ताकद संसदेत बसणाऱ्या लोकप्रतिनिधींमध्ये जितकी आहे, तितकीच अभ्यासिकांमध्ये बसून भविष्य घडवणाऱ्या विद्यार्थ्यांमध्येही आहे. त्या विद्यार्थ्यांचा विश्वास वारंवार तुटत असेल, तर ती केवळ परीक्षा व्यवस्थेची नव्हे, तर राष्ट्राच्या भविष्यातील गुंतवणुकीची हानी आहे.

आज गरज राजकीय आरोप-प्रत्यारोपांची नाही, तर व्यवस्थेच्या पुनर्बांधणीची आहे. कारण देश फुटत नाही, पण व्यवस्थेवरील विश्वास फुटला तर त्याची किंमत संपूर्ण समाजाला मोजावी लागते.

पेपरफुटी थांबली पाहिजे. कारण प्रत्येक फुटलेला पेपर हा केवळ प्रश्नपत्रिकेचा नाही, तर लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा, पालकांच्या आशांचा आणि राष्ट्राच्या भविष्यावरील विश्वासाचा स्फोट असतो.

# जैवविघटनशील घनकचऱ्यापासून अवघ्या २४ तासांत सेंद्रिय खत निर्मिती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



शहरे आणि गावांमध्ये दिवसेंदिवस वाढत असलेल्या जैवविघटनशील घनकचऱ्याच्या समस्येवर प्रभावी उपाय म्हणून पेटंट प्राप्त मायक्रोब्सच्या सहाय्याने विकसित करण्यात आलेले नियंत्रित अनएरोबिक कंपोस्टिंग (एसीसीएमए) तंत्रज्ञान पुढे आले आहे. या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जैवविघटनशील कचऱ्याचे केवळ २४ ते ३६ तासांत उच्च दर्जाच्या सेंद्रिय खतामध्ये रूपांतर करता येत असून, देशातील या प्रकारचे हे पहिले संशोधन असल्याचा दावा करण्यात आला. एव्हीके ग्रीन सोल्यूशन्स प्रा. लि. या पिनाक ग्रुपच्या उपकंपनीने विकसित केलेल्या अत्याधुनिक सेंद्रिय कचरा प्रक्रिया प्रकल्पाचे तसेच सस्टेरा प्रा. लि.च्या पर्यावरण प्रयोगशाळेचे उद्घाटन खासदार मेधा कुलकर्णी, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महापालिकेतील विरोधी पक्षनेते ॲड. नीलेश निकम, नगरसेविका मंजुषा खर्डेकर यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी पिनाक ग्रुपचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिनेश चंद्रात्रे, डॉ. कीर्ती चंद्रात्रे, पर्यावरण सल्लागार मैथिली चंद्रात्रे-शेट्टी, नितीन देशपांडे, मिलिंद देशपांडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. मैथिली चंद्रात्रे-शेट्टी यांनी संशोधनाची माहिती दिली, तर अनुषा कुलकर्णी यांनी आधुनिक घनकचरा व्यवस्थापनाची संकल्पना सादर केली. 'ऑर्गॅनिक वेस्ट कन्व्हर्टर (OWC)' या यंत्राद्वारे जैवविघटनशील कचऱ्याचे सेंद्रिय खतामध्ये रूपांतर केले जाते. केंद्र सरकारच्या घनकचरा व्यवस्थापन नियमावली-२०२६च्या निकषांनुसार विकसित करण्यात आलेले हे यंत्र पारंपरिक कंपोस्टिंगपेक्षा अधिक जलद, कार्यक्षम आणि पर्यावरणपूरक असल्याचे सांगण्यात आले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



### ग्रामपंचायत अधिकारी झुंबर होळकर यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार

दौंड (आरंभ पर्व) : गोपाळवाडी गावचे ग्रामपंचायत अधिकारी झुंबर होळकर यांची दौंड तालुका ग्रामसेवक संघटनेच्या संचालक पदी बिनविरोध निवड झाल्याने गोपाळवाडी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन गोपाळवाडी गावच्या प्रशासक सरपंच स्वातीताई राजू पवार, सोसायटीचे माजी चेअरमन बाळासाहेब गिरमे, गोपाळवाडी गावचे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष राजेंद्र सोनवलकर, गोपाळवाडी गावच्या माजी सरपंच वैशालीताई शिंदे, गोपाळवाडी गावच्या माजी उपसरपंच सीमाताई बोरावके, माजी शिक्षणाधिकारी डी वाय जगताप, अशोक जवक आदींच्या हस्ते करण्यात आला, यावेळी नवनिर्वाचित संचालक झुंबर होळकर म्हणाले की ग्रामसेवकांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती दिली.



### डॉ. रवींद्र भोळे आरोग्य सेवा केंद्रात पल्स पोलिओ मोहीम

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकार, आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन, आरोग्य विभाग जिल्हा परिषद, प्रायमरी हेल्थ सेंटर उरुळी कांचन ह्यांच्या विद्यमानाने आयोजित पल्स पोलिओ मोहीम डॉ.रवींद्र भोळे आरोग्य सेवा केंद्र येथे राबविण्यात आली. याप्रसंगी ज्येष्ठ समाजसेवक प्रवचनकार अपंग सेवक डॉ. रवींद्र भोळे, सीमा चव्हाण, मुक्ता डोके, प्रियांका कवडे ह्यांनी पल्स पोलिओ मोहिमेत सहभाग घेतला.

### दोशी आर.सी.अँड कंपनी मनुभाई अँड शाह एलएलपीमध्ये विलीनीकरण



पुणे (आरंभ पर्व) : मनुभाई अँड शाह एलएलपी यांनी आज पुणेस्थित दोशी आर.सी.अँड कंपनी (डीआरसी) या अकाउंटिंग आणि अँडव्हायझरी फर्मची मनुभाई अँड शाह एलएलपीमध्ये धोरणात्मक विलीनीकरण झाल्याची घोषणा केली. दोशी आर.सी.अँड कंपनी या प्रदीर्घ अनुभव असलेल्या कंपनीला चार्टर्ड अकाउंटंट्स क्षेत्रात जवळपास चार दशकांचा समृद्ध वारसा आहे. या विलिनीकरणामुळे मनुभाई अँड शाह एलएलपी ही १९०० पेक्षा अधिक कर्मचारी बळ असलेली कंपनी झाली असून २००० कर्मचाऱ्यांच्या टप्प्याकडे वाटचाल करत आहे. हे विलीनीकरण मनुभाई अँड शाह एलएलपीच्या दीर्घकालीन विकास धोरणातील एक महत्त्वपूर्ण टप्पा असून, यामुळे लेखापरीक्षण (ऑडिट), करसल्ला (टॅक्सेशन), सल्लागार सेवा (अँडव्हायजरी), नियामक (रेग्युलेटरी) आणि व्यवसाय सल्ला (बिझनेस कन्सल्टिंग) अशा विविध क्षेत्रांतील सेवा अधिक मजबूत होणार आहेत. अधिक गुंतागुंतीच्या आणि विकसित होणाऱ्या आर्थिक वातावरणात उद्योगांना भविष्यसज्ज व्यावसायिक सेवां द्वारे पाठबळ देण्याप्रती संस्थेची वचनबद्धता हे विलीनीकरण अधोरेखित करते. सन 1984 मध्ये सीए राजकुमार दोशी यांनी स्थापन केलेल्या दोशी आर. सी. अँड कंपनीने व्यावसायिक उत्कृष्टता, तांत्रिक कौशल्य आणि ग्राहकांशी विश्वासार्ह संबंधांद्वारे भक्कम प्रतिष्ठा निर्माण केली आहे. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करसल्ला, लेखापरीक्षण व अॅश्युरन्स, मूल्यांकन (व्हॅल्युएशन), वित्तीय अहवाल, स्टार्टअप सल्ला आणि अनुदान (सबसिडी) सेवा अशा विविध क्षेत्रांत संस्थेने अनेक उद्योगांना मार्गदर्शन केले आहे. या विलीनीकरणाबाबत बोलताना मनुभाई अँड शाह एलएलपीचे सह-व्यवस्थापकीय भागीदार कौशिक पटेल म्हणाले की, 'पाच दशकांच्या आमच्या यशस्वी प्रवासाला पुढे नेत असताना हे विलीनीकरण आमच्या विकासाच्या धोरणातील महत्त्वाचा टप्पा आहे. दोशी आर. सी. अँड कंपनीने गुणवत्ता, सचोटी आणि वेळेवर सेवा देण्याच्या आपल्या कटिबध्दतेमुळे ग्राहकांमध्ये विश्वास संपादन केला आहे. आमच्या दोन्ही संस्था एकत्र येणे हे उत्कृष्टतेच्या समान ध्येयाचे प्रतीक असून, यामुळे आमचे ग्राहक, कर्मचारी आणि सर्व संबंधित घटकांसाठी अधिक मूल्य निर्माण करण्यास आम्हाला सक्षम करेल.

**अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त लोणी काळभोर पोलीस स्टेशनतर्फे**

# विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व जनजागृती प्रभात फेरीचे आयोजन

**लोणी काळभोर-चंद्रकांत दुंडे (दै. आरंभ पर्व)**




दिनांक 29 जून 2026 रोजी अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त लोणी काळभोर पोलीस स्टेशनच्या वतीने श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था इंग्लिश मीडियम स्कूल, लोणी काळभोर, हवेली, पुणे येथे विद्यार्थ्यांसाठी जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सकाळी 10.30 ते 12.30 या वेळेत इयत्ता आठवी व दहावीच्या विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांचे दुष्परिणाम, सायबर गुन्हे, तसेच मोबाईलच्या योग्य वापराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले तसेच सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी घ्यावयाची खबरदारी व मोबाईलच्या अतिवापराचे होणारे दुष्परिणाम याबाबत माहिती देण्यात आली.

सदर कार्यक्रमास लोणी काळभोर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रदीप पवार, सपोनि जाधव, पोउपनि मुंडे, शाळेच्या प्राचार्या शेवाळे मॅडम, पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच शिक्षकवर्ग उपस्थित होते.

यानंतर अंमली पदार्थ विरोधी जनजागृतीसाठी प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. सदर प्रभात फेरी श्री स्वामी विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूल येथून सुरू होऊन श्री दत्त मंदिर चौक, खोकलाई देवी चौक, बिग बाजार चौक, श्री गणेश चौक, मारुती मंदिर चौक, सावता माळी चौक, बिग बाजार चौक, खोकलाई देवी, रामदरा रोड, लोणी काळभोर पोलीस स्टेशन, सरकारी हॉस्पिटल मार्गे पुन्हा इंग्लिश मीडियम स्कूल चौक येथे संपन्न झाली.

या प्रभात फेरीमध्ये पोलीस अधिकारी व अंमलदारांसह शाळेतील सुमारे 200 विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी अंमली पदार्थ विरोधी जनजागृतीपर घोषणा देत समाजामध्ये नशामुक्तीचा संदेश दिला.

लोणी काळभोर पोलीस स्टेशनच्या वतीने नागरिकांनी व विशेषतः युवकांनी अंमली पदार्थांपासून दूर राहावे व सुरक्षित डिजिटल वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## खेड तालुका ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या अध्यक्षपदी शंकर ढोरे

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुका ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या अध्यक्षपदी शंकर ढोरे यांची तर सचिवपदी बाबाजी चव्हाण यांची बिनविरोध निवड झाली.



महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन, शाखा खेड यांची पंचवार्षिक निवडणूक तसेच वार्षिक सभा येथे खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेच्या मार्गदर्शनासाठी जिल्हा शाखेचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी तालुका कार्यकारीणी घोषीत करण्यात आली. नवनिर्वाचित कार्यकारीणी पुढीलप्रमाणे - अध्यक्ष - शंकर काळुराम ढोरे, कार्याध्यक्ष सुदाम भिवाजी कड, उपाध्यक्ष - रवींद्र रामचंद्र उगले, सचिव - बाबाजी भालचंद्र चव्हाण, महिला उपाध्यक्ष - प्रतिभा हरिभाऊ डोंगरे, कोषाध्यक्ष - काकासाहेब जनार्दन मिंड, प्रसिद्धीप्रमुख शरद सुभाष शिरसाठ, कार्यकारिणी सदस्य - प्रमिला सुळके, अमोल भालेराव, प्रमोद बनसोडे, भागू भिवा आढारी आणि मधुकर डवने यांची निवड करण्यात आली.

निवडणूक निरिक्षक म्हणून शरद ढोले, गोपीनाथ खोमणे, देवेंद्र नलावडे आणि सानप भाऊसाहेब यांनी कामकाज पाहिले. खेड तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी यावेळी एकमताने पाठिंबा देत या बिनविरोध निवडीसाठी सहकार्य केले. नवनिर्वाचित कार्यकारिणीकडून ग्रामपंचायत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडून संघटना अधिक सक्षम केली जाईल. असे यावेळी बोलताना नवनिर्वाचित अध्यक्ष ढोरे यांनी सांगितले.

## खेड तालुक्यात मुसळधार पाऊस; शेतकरी वर्ग सुखावला

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर शहरासह खेड तालुक्यात पावसाने रविवारी (दि. २८ ) जोरदार हजेरी लावली. या पावसामुळं कामानिमित्त घराबाहेर पडलेल्या नागरीकांची मात्र चांगलीच त्रेधातिरपीट उडाली. या पावसाने शेतकरी वर्ग सुखावला आहे. शहरासह नजीकच्या वाड्यावस्त्यांवरही पावसानं जोरदार बॅटींग केली. तसेच गुळाणी, वाफगाव, पाईट आणि कडूस, वाडा या भागांमध्ये काळे ढग दाटून आल्यावर काही वेळात जोरदार पाऊस कोसळला.

वळवाच्या पावसानंतर गेल्या अनेक दिवसांपासून विश्रांती घेतल्यानंतर रविवारी पावसाने तालुक्यात दमदार हजेरी लावली. जवळपास दोन तास मुसळधार पडलेल्या पावसाने रस्त्यांवरील सखल भागात पाणी साठले होते. अचानक आलेल्या पावसामुळे बाहेर पडलेल्या नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. पावसापासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी दुकानांच्या शेड, बसस्थानक, मंदीरे या ठिकाणी आसरा घेतला. रविवारी



सकाळपासूनच वातावरण काहीसे ढगाळ होते. त्यामुळे उकाड्यातही वाढ झाली होती. दुपारी तीनच्या सुमारास ढगांच्या गडगडाटासह पावसाला सुरुवात झाली. शहरातील सगळीकडे जोरदार पाऊस झाला. अवघ्या दोन तासांच्या पावसाने शहरातील रस्त्यांवर ठिकठिकाणी पाणी साठलेले दिसून आले. त्यामुळे दुचाकीस्वारांना या रस्त्यावर साचलेल्या पाण्यातून मार्ग काढणे जिकरीचे ठरत होते. पाऊस ओसरल्यानंतर महामार्गावर मोठी वाहतूककोंडी झाली होती. तर तालुक्याच्या पूर्व भागातील खरपुडी व नजीकच्या पुलांवरून पाणी वाहत असल्याने या रस्त्यांवरील वाहतूक काही काळ बंद होती. दोनतास जोरदार सरी बरसल्यानंतर पावसाने काही काळ विश्रांती घेतली. सात वाजल्यानंतर पुन्हा बारीक पावसाला सुरुवात झाली. त्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला होता.

## नवी दिशा : एबीबीचे जागतिक नवोन्मेष केंद्र

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बंगळुरू येथील एबीबी इनोव्हेशन सेंटरमध्ये (एआयसी) पाच दिवस चाललेल्या एबीबी ॲक्सिलरेटरच्या सहाव्या आवृत्तीत विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांनी एकत्र येऊन सहकार्य केल्यास नवीन उत्पादने आणि उपाय अधिक वेगाने विकसित करता येतात, तसेच उद्योगांच्या बदलत्या गरजांसाठी आवश्यक असलेले भविष्यासाठी सज्ज कुशल मनुष्यबळ तयार करण्यासही मदत होते, हे दाखवून देण्यात आले. आजच्या काळात अनेक उद्योगक्षेत्र उद्योग सुरक्षितता वाढवणे, उत्पादकता सुधारणे आणि शाश्वत विकासाला चालना देणे या उद्देशाने आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर करत आहेत.अशा पार्श्वभूमीवर हा उपक्रम आयोजित करण्यात आला एबीबी इनोव्हेशन सेंटर (एआयसी) चे पूर्णवेळ संचालक जी. एन. व्ही.




सुब्बा राव यांनी सांगितले, "एबीबी ॲक्सिलरेटर हा एक जागतिक नवोन्मेष उपक्रम आहे. या उपक्रमात नवीन कल्पनांचे रूपांतर ग्राहकांसाठी उपयुक्त आणि प्रभावी उपायांमध्ये केले जाते. येथे विकसित होणारे नवोन्मेष केवळ प्रयोगांपुरते मर्यादित राहत नाहीत, तर त्यांचे मोठ्या प्रमाणावर वापरता येणाऱ्या उत्पादने आणि उपायांमध्ये रूपांतर होते. त्यामुळे उद्योगांची कार्यक्षमता वाढण्यास मदत होते. अत्याधुनिक संशोधन व विकास (आरअँडडी), उद्योगातील अनुभव, अभियांत्रिकी कौशल्य तसेच डिजिटल आणि एआय तंत्रज्ञान यांच्या मदतीने आम्ही ग्राहकांना अधिक मूल्य मिळवून देत आहोत आणि भविष्यातील उद्योगांसाठी आवश्यक क्षमता विकसित करत आहोत."

एबीबी इनोव्हेशन सेंटर (एआयसी) हे एबीबीच्या जगातील सर्वात मोठ्या तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी केंद्रांपैकी एक आहे. येथे संशोधन व विकास (आरअँडडी), अभियांत्रिकी, डिजिटल तंत्रज्ञान आणि जागतिक ऑपरेशन्स या क्षेत्रांमध्ये जवळपास 4,000 तज्ज्ञ कार्यरत आहेत. विविध उद्योगातील सखोल अनुभव, एआ, क्लाउड आणि डिजिटल तंत्रज्ञान यांच्या मदतीने हे केंद्र पुढील पिढीतील औद्योगिक तंत्रज्ञान विकसित करत आहे, नवीन उत्पादनांच्या विकासाला गती देत आहे आणि उद्योगांना अधिक स्वयंचलित पद्धतीने काम करण्याच्या दिशेने मदत करत आहे. एबीबी ऑटोमेशनचे ग्लोबल चीफ डिजिटल ऑफिसर राजेश रामचंद्रन यांनी सांगितले, "एबीबी मध्ये आम्ही ॲक्सिलरेटर कडे असा प्रभावी मंच म्हणून पाहतो, जिथे नाविन्यपूर्ण कल्पनांचे उद्योगांसाठी उपयुक्त उपायांमध्ये रूपांतर केले जाते. एबीबी मधील तज्ज्ञ, भागीदार, स्टार्टअप्स, शैक्षणिक संस्था आणि विविध क्षेत्रांतील विचारवंत यांना एकत्र आणून आम्ही औद्योगिक एआयच्या मदतीने भविष्यात अधिक स्वयंचलित, कार्यक्षम आणि शाश्वत उद्योगांसाठी मोठ्या प्रमाणावर वापरता येतील असे उपाय अधिक वेगाने विकसित करत आहोत." मागील आवृत्त्यांच्या यशानंतर एबीबी ॲक्सिलरेटर हा एबीबीच्या प्रमुख नवोपक्रम उपक्रमांपैकी एक बनला आहे.

## पुणे महापालिकेत वर्षभर विविध कार्यक्रम; पक्षनेते सभेची मान्यता

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेचे उपमहापौर मा. परशुराम वाडेकर यांच्या विशेष प्रयत्नांना मोठे यश मिळाले असून, महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त तसेच चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त पुणे महानगरपालिकेच्या वतीने वर्षभर विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्याच्या प्रस्तावाला आज झालेल्या पक्षनेते सभेत मान्यता देण्यात आली. मा. उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी दि. ०५ मे २०२६ रोजी पत्र क्र. १८१० द्वारे पुणे महानगरपालिकेत या ऐतिहासिक वर्षानिमित्त भव्य आणि नियोजनबद्ध कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी समिती स्थापन करण्याची मागणी केली होती. या मागणीस आज पक्षनेते सभेने मंजुरी दिली. यावर्षी महात्मा ज्योतिराव फुले यांचे द्विशताब्दी वर्ष देशभर आणि राज्यभर मोठ्या उत्साहात साजरे केले जात आहे. तसेच पुणे महानगरपालिकेचे सदस्य म्हणून त्यांच्या कार्याला १५० वर्षे पूर्ण होत असून, सामाजिक समतेच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण चवदार तळे सत्याग्रहालाही १०० वर्षे पूर्ण होत आहेत. महात्मा फुले यांची कर्मभूमी असलेल्या पुण्यात या ऐतिहासिक घटनांचे स्मरण भव्य स्वरूपात व्हावे, या उद्देशाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समितीने या उपक्रमासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यास मंजुरी दिली होती. तसेच एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या मुख्यसभेत सर्वपक्षीय नगरसेवकांनी वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करण्याची आग्रही मागणी केली होती.

# ३० हजार कोटींच्या प्लास्टिक पुनर्वापर उद्योगाला नवी दिशा

**२ ते ५ जुलैदरम्यान नवी दिल्लीत 'जीसीपीआरएस २०२६'**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

२०३५ पर्यंत ६९ ह्या कोटींपर्यंत मजल मारण्याची क्षमता असलेला आणि सध्या ३० हजार कोटी रुपये मूल्य असलेला भारतातील प्लास्टिक पुनर्वापर उद्योगासाठी तिसरी ग्लोबल कॉन्फरन्स अँड एक्झिबिशन ऑन प्लास्टिक रिसायकलिंग अँड सस्टेनेबिलिटी (जीसीपीआरएस २०२६) आयोजित करण्यात येणार आहे. ही परिषद २ ते ५ जुलै २०२६ दरम्यान नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे होणार असून अखिल भारतीय पातळीवरील अग्रगण्य संस्था ऑल इंडिया प्लास्टिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (एआयपीएमए) ने हे आयोजन केले आहे. या चार दिवसीय परिषदेला रसायन व खते मंत्रालय, पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, नीती आयोग तसेच गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभणार आहे.

जीसीपीआरएसचे अध्यक्ष श्री. अरविंद मेहता आणि एआयपीएमएचे अध्यक्ष श्री. सुनील शाह यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रगत धोरणे, उद्योगातील सहकार्य आणि जबाबदार संसाधन व्यवस्थापन व परिपत्र अर्थव्यवस्था या घटकांना प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांच्या माध्यमातून भारतातील शाश्वतता परिसंस्था मजबूत करण्यावर सातत्याने भर देण्यात येत आहे. आशियातील प्लास्टिक पुनर्वापर आणि शाश्वततेसाठीचे सर्वात मोठे प्रदर्शन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या जाणाऱ्या या प्रदर्शनात १२ देशांमधील २०० हून अधिक प्रदर्शक सहभागी होणार असून, १२,००० चौरस मीटरच्या विस्तीर्ण प्रदर्शन क्षेत्रात प्लास्टिक कचरा व्यवस्थापन आणि पुनर्वापराच्या संपूर्ण मूल्यसाखळीचे प्रतिनिधित्व केले जाणार आहे. 'जीसीपीआरएस २०२६' भारतातील प्लास्टिक पुनर्वापर क्षेत्राच्या वाढीला गती देण्यासोबतच केंद्र सरकारच्या शाश्वतता, संसाधन कार्यक्षमता, परिपत्र अर्थव्यवस्था आणि कार्बन-न्यूट्रल भविष्यासाठीच्या दृष्टिकोनाला बळकटी देणारे ठरणार आहे. हे प्रदर्शन प्लास्टिक कचरा व्यवस्थापनासाठी एक सर्वसमावेशक व्यासपीठ म्हणून काम करेल. यामध्ये तंत्रज्ञान पुरवठादार, पुनर्वापर करणारे उद्योग, धोरणकर्ते, ब्रँड मालक, उद्योजक, संशोधक आणि पर्यावरण तज्ज्ञ एकाच व्यासपीठावर येणार आहेत.प्रदर्शनामध्ये ग्राहकांकडून निर्माण होणाऱ्या प्लास्टिक कचऱ्याच्या व्यवस्थापनातील अत्याधुनिक तंत्रज्ञानावर भर असेल. यामध्ये कचरा संकलन व वर्गीकरण प्रणाली, स्वयंचलित कचरा छाननी तंत्रज्ञान, प्रगत यांत्रिक व रासायनिक पुनर्वापर उपकरणे, कचऱ्यापासून तेल व ऊर्जा निर्मिती तंत्रज्ञान, वापरानंतरच्या कचऱ्यावरील उपाययोजना तसेच पुनर्वापरित प्लास्टिक या क्षेत्रांसाठी विशेष बाजारपेठ निर्माण करण्यावर भर असेल.

उद्योजकांना मार्गदर्शन करण्यासाठी विशेष कन्सल्टंट क्लिनिक उपलब्ध असेल, तर पर्यावरण डेस्क विस्तारित उत्पादक जबाबदारी (EPR) आणि नियामक अनुपालनाबाबत मार्गदर्शन करण्यासाठी सज्ज असेल. शून्य कचरा कार्यक्रम म्हणून आयोजित करण्यात येणारे 'जीसीपीआरएस 2026' हे स्वच्छ भारत अभियानाच्या संकल्पनेशी सुसंगत असून, तंत्रज्ञानावर आधारित पुनर्वापर उपायांद्वारे प्लास्टिक कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन आणि भारतातील परिपत्र अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा त्यामागील उद्देश आहे. या कार्यक्रमातील प्रमुख आकर्षणांमध्ये पुनर्वापर क्षेत्रातील स्टार्टअप्सना प्रोत्साहन देणारा सायन्स अँड टेक्नॉलॉजी क्लस्टर, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांचा सहभाग असलेला दोन दिवसीय सस्टेनेबिलिटी फोरम आणि उद्योग क्षेत्रातील प्रमुख नेते व धोरणकर्त्यांचा सहभाग असलेली विशेष सीइओ राउंडटेबल बैठक यांचा समावेश आहे. या बैठकीत भारताला आवश्यक असलेल्या सुमारे ३० लाख टन दर्जेदार पुनर्वापरित प्लास्टिकच्या गरजेवर चर्चा करून या क्षेत्रासाठी भविष्यातील दिशा निश्चित केली जाणार आहे. प्लास्टिक कचरा व्यवस्थापन आणि पुनर्वापराशी संबंधित सर्व भागधारकांसाठी ही परिषद संवाद, सहकार्य आणि धोरणात्मक चर्चेसाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वच्छ भारत आणि विकसित भारत २०४७ या संकल्पनेप्रती उद्योग क्षेत्राच्या सामूहिक बांधिलकीचे प्रतीक आहे. प्लास्टिक मूल्यसाखळीशी संबंधित उद्योग व्यावसायिक, पुनर्वापर करणारे उद्योग, ब्रँड मालक, उद्योजक, गुंतवणूकदार आणि सर्व संबंधित घटकांना या ऐतिहासिक कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या आयोजनाचा माध्यमातून भारतातील प्लास्टिक पुनर्वापराच्या भविष्यास आकार देणारे नवीन तंत्रज्ञान, व्यावसायिक संधी, धोरणात्मक बदल आणि शाश्वत उपाय जाणून घेण्याची संधी मिळणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### लहू उघडे नेकेड अँड अफ्रेड: आदिमानव मध्ये विजयी




मुंबई (आरंभ पर्व) : अनेक दिवस आव्हानात्मक दुर्गम भू-प्रदेश, मर्यादित साधनसंपत्ती आणि सतत बदलणाऱ्या परिस्थितीशी झुंज दिल्यानंतर लहू उघडे हे वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीच्या नेकेड अँड अफ्रेड: आदिमानव चे विजेते ठरले आहेत. आपल्या एव्हरेस्ट शिखर सर करण्यासाठी आणि वर्षानुवर्षांच्या निसर्गातील अनुभवासाठी ओळखले जाणारे लहू हे डिस्कव्हरीच्या या नावाजलेल्या आंतरराष्ट्रीय ॲडव्हेंचर सर्व्हायव्हल फ्रँचायझीच्या भारतीय आवृत्तीचे पहिले विजेते बनले आहेत. आशिया पॅसिफिक प्रदेशातील आपल्या पहिल्या पदार्पणासह, हा शो आदिमानव जीवनशैलीशी निगडित प्रवृत्ती, चिकाटी आणि सर्व्हायव्हल कौशल्यांने प्रेरित आहे. नेकेड अँड अफ्रेड: आदिमानव ने विविध पार्श्वभूमीतून आलेल्या सहा सहभागींना एकत्र आणले आणि त्यांना फिलिपाइन्समधील पालावानच्या आव्हानात्मक रानावनात ठेवले. या संपूर्ण प्रवासादरम्यान त्यांनी कठोर परिस्थितीला तोंड दिले, अनोळखी प्रदेशातून वाट काढली आणि जिथे प्रत्येक निर्णय महत्त्वाचा ठरतो अशा वातावरणाशी जुळवून घेतले.

### खेड तालुक्यात दोन जुगार अड्डयांवर छापे; गुन्हा दाखल


राजगुरूनगर (आरंभ पर्व) : राजगुरुनगर शहराजवळील चांडोली आणि वरची भांबुरवाडी येथील जुगार अड्डयांवर खेड पोलिसांनी छापे टाकून २६ संशयितांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला. चांडोली येथे संध्याकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास एका बैलांच्या गोठ्याच्या शेडमध्ये टाकलेल्या छाप्यात १४ जण जुगार खेळताना आढळले. तर वरची भांबुरवाडी येथे एका पत्र्याच्या शेडमध्ये जुगाराचा अड्डा सुरू होता. तेथे १२ जण जुगार खेळताना सापडले. चांडोली आणि वरची भांबुरवाडी (ता. खेड ) या दोन्ही ठिकाणांहून पोलिसांनी रोख रक्कम, पत्ते, चारचाकी व दुचाकी वाहने आदी मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोलिस हवालदार सागर वसंत शिंगाडे यांनी खेड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.



### "बेबी डू डाय डू" मध्ये अँग्री यंग वुमन दिसणार हुमा कुरेशी

पुणे (आरंभ पर्व) : चित्रपटांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून स्त्री एक कमकुवत पात्र दाखवले जाते. स्त्रीला वाचवण्यासाठी सुद्धा शेवटी एक पुरुष येतो आणि खलनायकापासून त्या स्त्रीची सुटका करतो. अशा पारंपारिक भूमिकेपेक्षा मला वेगळी भूमिका पडद्यावर साकारायची होती. "बेबी डू डाय डू" च्या निमित्ताने मला ही संधी मिळाली. आपल्याला अनेक वर्षांपासून पडद्यावर अँग्री यंग मॅन पाहण्याची सवय आहे, परंतु बेबी डू डाय डू चित्रपटांमध्ये प्रथमच तुम्ही अँग्री यंग वुमन पहाल असे प्रसिद्ध अभिनेत्री हुमा कुरेशी यांनी सांगितले. सलीम सिबलिंग आणि पुणे 04 पिक्चर यांनी निर्मिती केलेला हुमा कुरेशी यांची प्रमुख भूमिका असलेला बेबी डू डाय डू हा हिंदी चित्रपट येत्या 3 जुलै रोजी प्रदर्शित होत आहे या निमित्ताने पुण्यातील औंध येथील वेस्टएंड मॉल येथे हुमा कुरेशी, चित्रपटाचे दिग्दर्शक नचिकेत सामंत, अभिनेता रचित सिंग आणि मरुधर शेखावत यांनी भेट दिली. त्यादरम्यान त्यांनी चित्रपट संदर्भात प्रेक्षकांशी गप्पा मारल्या.

### Nova 2 Neo आणि Nova 2 Pro च्या पुढील विक्रीची घोषणा





पुणे (आरंभ पर्व) : Ai+ Smartphone ने नुकत्याच लॉन्च केलेल्या Nova 2 Neo आणि Nova 2 Pro च्या पुढील विक्रीची घोषणा केली आहे, कारण 26 जून रोजी Flipkart वर झालेल्या पहिल्या विक्रीत दोन्ही स्मार्टफोन संपूर्णपणे विकले गेले. हे उपकरणे 22 जून रोजी India's Got Nova येथे सादर करण्यात आली — जो ब्रँडचा प्रमुख लॉन्च कार्यक्रम आहे — हा कार्यक्रम प्रसिद्ध Gadget Guru राजीव मखनी यांनी सादर केला, ज्यात विनोदकार व YouTuber समय रैना आणि Ai+ Smartphone चे CEO माधव शेठ उपस्थित होते. या कार्यक्रमात Ai+ Smartphone च्या Open Review Program अंतर्गत अग्रगण्य तंत्रज्ञान निर्माते, समीक्षक, माध्यम प्रतिनिधी आणि ग्राहकही सहभागी झाले होते, जे पारदर्शकता आणि समुदाय-चालित उत्पादन विकासाप्रती ब्रँडची वचनबद्धता अधोरेखित करते. ग्राहकांकडून मिळालेला हा भक्कम प्रतिसाद Nova Series च्या वाटचालीत एक महत्त्वाचा टप्पा ठरतो.

### पुर्व हवेलीत महागड्या दराने पेट्रोल



लोणी काळभोर-चंद्रकांत दुंडे (आरंभ पर्व) : सध्या महागाईने उच्च्यांक गाठला असतानाच पुणे सोलापूर महामार्गावरील पुर्व हवेलीतील काही पेट्रोल पंपावर साधे पेट्रोल संपल्याचे कारण सांगत पावर पेट्रोल भरण्यास सांगितले जाते.साध्या पेट्रोल पेक्षा ते साधारणपणे नऊ रुपये लीटरने महाग पडत आहे.त्यामुळे ग्राहकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.अगोदरच एकशे आकरा रुपये लीटरप्रमाणे इंधन भरण्यासाठी प्रापंचिक जीवनात काटकसर करुन खर्च भागवावा लागत आहे.त्यातच आठवड्यातुन दोन तीन दिवस साधे पेट्रोल संपल्याचे कारण सांगत एकशेवीस रुपये दराचे पावर पेट्रोल भरावे लागत आहे. पावर पेट्रोलची किंमत जास्त असली तरी ॲव्हरेजमध्ये काहीही फरक पडत नसल्याचे नागरीक सांगत आहेत.त्यामुळे पावर पेट्रोलच्या नावाखाली साधे पेट्रोल तर विकले जात नाही ना अशी शंका नागरिक व्यक्त करत आहेत. यावरून नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. तरी खरेच साधे पेट्रोल पंपचालकांना कमी मिळते किंवा जाणून बुजून कमी असल्याचे सांगत ग्राहकांना वेठीस धरले जाते अशी कुजबुज नागरिकांमध्ये सुरू आहे.तरी या प्रकाराची चौकशी होण्याची गरज नागरीकांमथुन व्यक्त होत आहे.

# 'हूर' गाण्याने कोक स्टुडिओ भारतच्या चौथ्या सीझनमध्ये घडवली काश्मीरची सफर




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

समकालीन संगीताच्या सोबतीने भारताच्या समृद्ध लोकसंगीत आणि प्रादेशिक संगीत परंपरांना प्रकाशझोतात आणण्याचा आपला प्रवास सुरू ठेवत कोक स्टुडिओ भारत त्याच्या चौथ्या सीझनच्या चौथ्या गाण्यासह परत आला आहे. 'हूर' गाण्याच्या माध्यमातून हा प्रवास यंदा काश्मीरच्या खोऱ्यात पोहोचला आहे. 'हूर' ही काश्मीरच्या शतकानुशतके जुन्या मौखिक कथाकथन परंपरेने प्रेरित असलेली लोककथा आहे, जिथे गायक-संगीतकार वेगवेगळ्या मैफिलींमध्ये एकत्र जमून राजे, प्रेमीयुगुल, भटके आणि गूढ गोष्टींच्या कथा गाण्यातून सादर करायचे. हे गाणे काश्मीरी कथाकथन परंपरा आणि 'अफसाना गोरी'च्या आध्यात्मिक तत्वांवर आधारित आहे, ज्यामध्ये 'शेख' आणि 'हूर' या दोन पात्रांचा प्रवास संगीत आणि कथाकथनाच्या माध्यमातून उलगडतो. प्रेम, दुरावा आणि भक्ती या संकल्पनांच्या अवतीभोवती फिरणारी ही कथा काश्मीरी लोककथांमध्ये आढळणारे पौराणिक आणि काल्पनिक रंग घेऊन येते. हे सर्व प्रभाव या गाण्याच्या रचनेमध्ये विविध आवाजांचे स्तर, मनाला स्पर्श करणारी वाद्ये आणि रॉक म्युझिकच्या संगमाने गुंफले गेले आहेत, ज्यामुळे या परंपरेचा मूळ गाभा टिकून राहतो आणि नवीन पिढीच्या श्रोत्यांसमोर एका आधुनिक स्वरूपात सादर होतो. ही कथा प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचे काम गायक-गीतकार फहीम अब्दुल्ला, संगीतकार व गायक अर्सलान निजामी आणि संगीतकार व गायक उस्ताद कैसर निजामी यांनी केले आहे. काश्मीरच्या संगीतबद्ध कथाकथन परंपरेने प्रेरित असलेले 'हूर' गाणे कथाकथन आणि सुरावलींच्या दरम्यान फिरत राहते, ज्यामुळे अगदी एखाद्या जिवंत मैफिलीसारखा अनुभव मिळतो. हे गाणे जुन्या काश्मीरी दंतकथेच्या रचनेवर आधारित असले, तरी त्याची निर्मिती आधुनिक संगीताच्या साथीने केली गेली आहे, ज्यामुळे काश्मीरी परंपरेचे वातावरण आणि भावना न गमावता हे गाणे आजच्या काळातील वाटते. या गाण्याचा शेवट एका काश्मीरी काव्यपंक्तीने होतो, ज्यामुळे ही कथा ज्या मातीतून जन्माला आली, तिथेच श्रोत्यांना परत घेऊन जाते.

प्रत्येक सीझनमध्ये कोक स्टुडिओ भारतने भारताच्या प्रादेशिक संगीत परंपरांमधील समृद्धता शोधण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी कलाकारांसोबत काम केले गेले आहे, जे सांस्कृतिक कथांचा मूळ गाभा टिकवून ठेवत आजच्या श्रोत्यांसाठी त्यांचा नवा अर्थ लावतात. 'हूर' गाणे याच प्रवासाचा पुढचा भाग आहे, जे काश्मीरची एक लोककथा विविध भौगोलिक सीमा आणि पिढ्यांमधील श्रोत्यांपर्यंत पोहोचवते.

## 'एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनल'ने पटकावला 'आउटस्टँडिंग कंपनी' पुरस्कार




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारताच्या वैद्यकीय तंत्रज्ञान (मेडटेक) क्षेत्रासाठी ऐतिहासिक ठरणाऱ्या कामगिरीत 'एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनल'ला 'सर्जिकल रोबोटिक्स टेक्नॉलॉजी (एसआरटी) इंडस्ट्री अवॉर्ड्स २०२६' मध्ये आउटस्टँडिंग कंपनी या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. केवळ सर्जिकल रोबोटिक्स क्षेत्रासाठी समर्पित असलेल्या जगातील अत्यंत प्रतिष्ठित पुरस्कारांपैकी हा एक सन्मान असून, हा बहुमान मिळवणारी ही पहिलीच भारतीय कंपनी ठरली आहे. जागतिक स्तरावर नावाजलेल्या सर्जिकल रोबोटिक्स क्षेत्रातील नवनिर्माते आणि वैद्यकीय तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य कंपन्यांमधून (ज्यामध्ये इनट्युटिव्ह, मेडट्रॉनिक, जॉन्सन अँड जॉन्सन मेडटेक, डिस्टलमोशन, मेरिल, मायक्रोपोर्ट, थिंक सर्जिकल, फुटेक आणि प्रिसिजन आयओ ग्रुप यांचा समावेश आहे) या भारतीय कंपनीची निवड करण्यात आली आहे. ही कामगिरी कंपनीसाठी एक महत्त्वपूर्ण मैलाचा दगड ठरली असून, जागतिक सर्जिकल रोबोटिक्सच्या परिदृश्यात एक प्रमुख अग्रगण्य शक्ती म्हणून तिच्या उदयावर यामुळे शिक्कामोर्तब झाले आहे.

## पुण्यातील बी.टेक प्रथम वर्षाचा विद्यार्थी मानस संधूची नॉर्वेमधील प्रतिष्ठित आशिया-युरोप लीडरशिप ट्रेनिंग कार्यक्रमासाठी भारतातून निवड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील न्यूटन स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी - एडीवायपीयू (ADYPU) येथे कॉम्प्युटर सायन्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) शाखेत प्रथम वर्षात शिक्षण घेणारा मानस संधू याची आशिया-युरोप फाउंडेशन (ASEF) च्या ASEFYLS 2026 कॅपॅसिटी ट्रेनिंग आणि नॉर्वेतील ट्रॉम्सो (Tromsø) येथे होणाऱ्या आर्क्टिक लीडरशिप ट्रेनिंग कार्यक्रमासाठी एएसईएफ लीडर 2026 म्हणून निवड झाली आहे. विशेष म्हणजे, यावर्षीच्या आर्क्टिक लीडरशिप ट्रेनिंग कार्यक्रमासाठी भारताचे प्रतिनिधित्व करणारा मानस हा



भारतातील एकमेव विद्यार्थी आणि युवा नेता ठरला आहे.

या कार्यक्रमात आशिया आणि युरोपमधील निवडक युवा नेते एकत्र येतात. येथे नेतृत्व, धोरणांवरील चर्चा, शाश्वत विकास, भविष्यातील संधी, तंत्रज्ञान आणि विविध देशांतील संस्कृतींमधील सहकार्य अशा विषयांवर चर्चा व प्रशिक्षण दिले जाते. या कार्यक्रमासाठी 52 देशांतून 3,600 हून अधिक अर्ज प्राप्त झाले होते. अशा मोठ्या स्पर्धेत मानस संधूची निवड होणे ही त्याच्यासाठी आणि भारतासाठी मोठी आंतरराष्ट्रीय मान्यता मानली जात आहे. मानस संधूने शिक्षण, तंत्रज्ञान, क्रीडा, संगीत आणि समाजसेवा या विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तो राष्ट्रीय स्तरावरील स्केटिंगपटू, प्रशिक्षित संगीतकार, काउंटर स्ट्राईक (CS) ई-स्पोर्ट्स खेळाडू असून फॉरेंजर्स फाउंडेशन या युवा नेतृत्वाखालील संस्थेचा संस्थापक सदस्य आहे. त्याच्या योगदानामुळे या संस्थेशी 800 हून अधिक स्वयंसेवक जोडले गेले आहेत. संस्थेने 330 पेक्षा जास्त सामाजिक उपक्रम राबवले असून महाराष्ट्रातील 900 हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली आहे. विशेष गरजा असलेल्या व्यक्तींसाठी केलेल्या कार्याबद्दल या संस्थेला नॅशनल असोसिएशन ऑफ डिसेबल्ड एंटरप्रायझेस कडूनही गौरव मिळाला आहे.

## मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेअंतर्गत थेऊरफाटा येथे कुक्कुटपालन प्रशिक्षण शिबिर उत्साहात

- १३८ नव-कुक्कुटपालक शेतकरी उद्योजकांचा सहभाग
- शास्त्रोक्त प्रशिक्षणासह शासकीय योजनांची माहिती



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लोणी काळभोर : मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेअंतर्गत पूर्व हवेलीतील शेतकऱ्यांसाठी थेऊरफाटा येथे एकदिवसीय कुक्कुटपालन प्रशिक्षण शिबिर उत्साहात पार पडले. शिबिराला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून १३८ नव-कुक्कुटपालक शेतकरी उद्योजकांनी सहभाग घेऊन प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

या प्रशिक्षणात कुक्कुटपालन व्यवसायाचे शास्त्रोक्त व्यवस्थापन, पक्ष्यांचे संगोपन, खाद्य व्यवस्थापन, रोगप्रतिबंधक उपाययोजना तसेच शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेतील विविध लाभ मिळविण्यासाठी प्रशिक्षण प्रमाणपत्र आवश्यक असल्याने या शिबिराला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

या कार्यक्रमास आमदार ज्ञानेश्वर कटके, पंचायत समिती हवेलीचे सभापती युवराज काकडे, उपसभापती विद्याताई गायकवाड, सदस्य अमोल टेकाळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे हवेली तालुकाध्यक्ष दिलीप वाल्हेकर, जी. बी. चौधरी, थेऊरचे माजी उपसरपंच भरत कुंजीर, स्वप्नील कुंजीर, रूपचंद बोडके यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार कटके यांनी शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीबरोबरच पशुपालन व कुक्कुटपालन व्यवसाय स्वीकारून उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण करावेत, असे आवाहन केले. ग्रामीण भागात पशुधन आधारित उद्योगांना चालना देण्यासाठी अशा प्रशिक्षण शिबिरांची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल सभापती युवराज काकडे यांचे त्यांनी कौतुक केले.

## आरआर काबेल फाउंडेशनचा सीएसआर उपक्रम रोशनीने रस्ता सुरक्षा मोहीम केली पूर्ण



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आरआर काबेल फाउंडेशनचा सीएसआर उपक्रम रोशनीने एलिक्सिर फाउंडेशनच्या सहयोगाने "वाहतूक जागरूकता, व्यवस्थापन आणि रस्ता सुरक्षा मोहीम" यशस्वीरित्या पूर्ण केल्याची घोषणा केली आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यांतील रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता वाढवणे हा होता. वर्दळीचे जंक्शन, अपघात प्रवण क्षेत्र, शाळा आणि रुग्णालये यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी हे बूथ उभारल्यास चालकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याची सतत आठवण करून देतात. यामुळे अतिवेग, मद्यपान करून गाडी चालवणे आणि इतर असुरक्षित पद्धतींना आळा बसतो. हे बूथ अपघात किंवा आपत्कालीन परिस्थितीत पोलिसांना त्वरित मदत पोहोचवण्यास सक्षम करतात, ज्यामुळे जीव वाचवण्यास मदत होते. याशिवाय, प्रवासादरम्यान व्यक्तींना मदत किंवा मार्गदर्शनाची गरज भासल्यास हे पोलिस बूथ सहाय्य केंद्र म्हणून काम करतात. रस्ता सुरक्षा वाढवून, अपघात रोखून आणि सुरक्षिततेची भावना निर्माण करून पोलिस बूथ केवळ कायदा अंमलबजावणी साध्य करण्यासह समाजाला महत्त्वपूर्ण फायदेही पोहोचवतात.

## डेलॉईट इंडिया जीएसटी @9 सर्वेक्षण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) आर्थिक विकास, निर्यात आणि रोजगार निर्मितीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असताना, जीएसटीबाबत त्यांची धारणा केवळ अनुपालनाच्या बंधनातून बदलत जाऊन औपचारिकता आणि कार्यक्षमतेला चालना देणाऱ्या प्रणालीकडे वळली आहे. रिटर्न भरण्याची सुलभ प्रक्रिया आणि मर्यादांमध्ये (थ्रेशोल्ड) करण्यात आलेल्या शिथिलतेमुळे अनुपालन सुलभ झाले असले, तरी उद्योगांना जीएसटी सुधारणांच्या पुढील टप्प्यात तरलता वाढविणे, इनपुट टॅक्स क्रेडिट ( आयटीसी) नियम अधिक सोपे करणे आणि कार्यरत भांडवलावरील दबाव कमी करणे यांना प्राधान्य दिले जावे, अशी अपेक्षा आहे. डेलॉईट इंडिया यांच्या जीएसटी@9 सर्वेक्षण : द नेक्स्ट फेज – जीएसटी 2.0 नुसार, एमएसएमई आता केवळ जीएसटीचा अवलंब करण्यापलीकडे जाऊन त्याच्या अधिक परिणामकारक वापरावर भर देत आहेत. सर्वेक्षणातील निष्कर्षांमधून तरलता वाढविणे आणि अनुपालन प्रक्रिया सुलभ करण्यासाठी करण्यात येणाऱ्या सुधारणांना मोठा पाठिंबा असल्याचे दिसून आले आहे.

## विद्यार्थीदशेत झोपू न देणारी स्वप्ने बाळगा : डॉ. अनिल दुधभाते

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दुधभाते ऑप्टोमेट्री कॉलेज आणि आदित्य फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यार्थीदशेत मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी झपाटून परिश्रम करण्याची प्रेरणा यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मिटकॉन कंपनीचे संचालक डॉ. गणेश खामगळ होते. बन्सल क्लासेस, पुणेचे संचालक अभिषेक अवचार आणि प्रसिद्ध लेखिका प्रियंका चौधरी या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.




दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. दुधभाते ऑप्टोमेट्री कॉलेजचे प्राचार्य डॉ. अनिल दुधभाते यांच्या हस्ते सर्व मान्यवरांचा शाल व डॉ. दुधभाते लिखित 'नेत्रकोष' हे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. स्नेहल मानपुत्र यांनी प्रास्ताविक केले, तर सूत्रसंचालन महाविद्यालयाची विद्यार्थिनी श्रेया महामुनी हिने केले.

यावेळी अभिषेक अवचार आणि लेखिका प्रियंका चौधरी यांनी विद्यार्थ्यांना करिअर, ध्येय आणि यश याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना डॉ. अनिल दुधभाते म्हणाले, "आपण झोपेत पाहतो ती स्वप्ने नसतात, तर जी स्वप्ने आपल्याला झोपू देत नाहीत, तीच खरी स्वप्ने असतात. ती पूर्ण करण्यासाठी झपाटून काम करा." महाविद्यालयाच्या प्राध्यापिका काजोल माणिकपूरी यांनी सादरीकरणाद्वारे ऑप्टोमेट्री अभ्यासक्रम, त्यातील करिअरच्या संधी आणि या क्षेत्रातील उज्ज्वल भवितव्याची माहिती दिली. महाविद्यालयाची विद्यार्थिनी प्राजक्ता हिने दुधभाते ऑप्टोमेट्री कॉलेजमधील दर्जेदार शिक्षण, अनुभवी प्राध्यापक आणि आधुनिक सुविधांबाबतचा अनुभव उपस्थितांसमोर मांडला.

# 'अब होगा हिसाब' सीझन २ चा ट्रेलर प्रदर्शित




**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीची मोफत, प्रीमियम आणि जाहिरात-आधारित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा असलेल्या ॲमेझॉन एमएक्स प्लेअरने 'अब होगा हिसाब' या त्यांच्या ओरिजिनल रिव्हेंज ड्रामा सीरिजच्या दुसऱ्या सीझनचा ट्रेलर आज प्रदर्शित केला आहे. पहिल्या सीझनला प्रेक्षकांकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर हा ट्रेलर सादर करण्यात आला आहे. 18 जून रोजी प्रीमियर झाल्यापासून या सीरिजने आपल्या उत्कंठावर्धक कथानक आणि प्रभावी अभिनयामुळे प्रेक्षकांच्या मनावर ठसा उमटवला असून या सीरिजला मोठ्या प्रमाणावर पसंती मिळाली आहे. या उत्साहवर्धक प्रतिसादाच्या जोरावर ॲमेझॉन एमएक्स प्लेअर ही सीरिज अपेक्षेपेक्षाही लवकर दुसऱ्या सीझनसह प्रेक्षकांच्या भेटीला आणत आहे. अरे स्टुडिओची निर्मिती असलेला 'अब होगा हिसाब' सीझन 2 हा 3 जुलै रोजी प्रदर्शित होणार आहे.

दुसऱ्या सीझनचा ट्रेलर पहिल्या सीझनचा शेवट जिथे झाला होता, तिथूनच सीझन 2 सुरू होतो. या सीझनमध्ये बॉबीने बंटीचा शोध घेण्याचा ध्यास घेतला आहे. यातील बॉबीची व्यक्तिरेखा शाहीरने तर बंटीची व्यक्तिरेखा अविनाश मिश्राने साकारली आहे. सत्य समोर आणण्यासाठी तो यापूर्वीपेक्षाही अधिक पुढचे पाऊल टाकण्यास तयार आहे. त्याच्या या शोध घेण्याच्या प्रवासात तो गोल्डीच्या (संजय कपूर यांनी साकारलेली व्यक्तिरेखा) जगात जातो. गोल्डी हा अत्यंत प्रभावशाली आणि सहज कोणालाही आपल्या जवळ न येऊ देणारा माणूस आहे. त्याच्यापर्यंत पोहोचणे वाटते तितके सोपे नसते. गोल्डी सहज कोणावरही विश्वास ठेवत नसल्यामुळे बॉबीला त्याचा विश्वास संपादन करण्यासाठी प्रत्येक पाऊल सावधपणे टाकावे लागते. जसजसा बॉबी त्याच्या जवळ पोहोचू लागतो, तसतशी अनेक गुपिते समोर येऊ लागतात आणि नात्यांमधील तडे दिसू लागतात. गोल्डीचा बॉबीवरील विश्वास डळमळीत होऊ लागतो आणि एका अस्वस्थ युतीची जागा संशय, फसवणूक आणि संघर्षाच्या धोकादायक खेळाने घेतली जाते. संजय कपूर आणि शाहीर यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या सीरिजमध्ये मौनी रॉय, अविनाश मिश्रा, निम्रत कौर अहलुवालिया, हरमन सिंघा आणि आशीमा वर्दान हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकांमध्ये झळकणार आहेत. दुसरा सीझन अधिक गुंतागुंतीचे कथानक, अधिक मोठी आव्हाने आणि प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवणारी अनपेक्षित वळणे घेऊन येणार आहे. ॲमेझॉन एमएक्स प्लेअरचे डायरेक्टर आणि कंटेंट प्रमुख अमोघ दुसाद म्हणाले, "'अब होगा हिसाब'ला मिळालेला प्रतिसाद खरोखरच मनाला स्पर्श करणारा आहे. प्रेक्षक या सीरिजच्या कथाविश्वाशी इतक्या मोठ्या प्रमाणावर जोडले गेलेले पाहणे, आमच्यासाठी आणि या सीरिजशी संबंधित प्रत्येकासाठी अत्यंत समाधानकारक आहे.